
म. ठाणे
३७५
७९२८

# ...माला

## पुष्प ३ रें

## समर्थांचें आत्मचरित्र



REFBK-0003720

...र,
बी. ए.; एलएल. बी., कऱ्हाड.

किंमत ६ आणे.

॥ श्री ॥

बालबोध

# समर्थ-वाङ्मयमाला

पुष्प ३ रें

## समर्थांचें आत्म--चरित्र

समर्थांचें संक्षिप्त चरित्र व कठिण शब्दांचे अर्थ यांसह

लेखक


**सदाशिव खंडो आळतेकर**

बी. ए., एल्एल्. बी., कऱ्हाड,

सुलभ दासबोध, समर्थ-रत्न-संग्रह, समर्थांची करुणापर कविता, समर्थ-सुभाषित-कर्ते


॥ हें ज्ञान रामकृपेनें। धन्य रामउपासना ॥
॥ रामदास्य घडे ज्याला । तो सर्वत्र रामदास हो ॥
॥ हें प्रचीतीचें बोलिलें। आधीं केलें मग सांगितलें ॥
॥ मानेल तरी पाहिजे घेतलें। कोणीएकें ॥


आवृत्ति पाहिली, प्रती २०००

ज्येष्ठ शुद्ध १३ शके १८५०

किंमत सहा आणे.

॥ श्री ॥

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| प्रस्तावना | १-१४ |
| समर्थांचें संक्षिप्त चरित्र | १५-१७ |
| मठ, महंत व शिष्य | १८-२० |
| भाग | |
| १ ला दासबोधांतर्गत | २१-६८, ११५-११७ |
| २ रा दासबोधेतर ग्रंथांतील | ६९-११५ |



प्रकाशकः—सदाशिव खंडो आळतेकर, बी. ए., एल्एल्. बी., कऱ्हाड.

मुद्रकः—वामन वासुदेव अतीतकर, बी. ए., नवीन समर्थ विद्यालयाचा समर्थ भारत छापखाना, ३२५ सदाशिव पेठ, पुणें शहर.



प्रकाशकांनीं सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ३७२० कोकण


# बालबोध समर्थ-वाङ्मयमाला

पुष्प ३ रें

## [illegible]चें आत्मचरित्र

REFBK-0003720
REFBK-0003720

## प्रस्तावना.

उत्तिष्ठत ! जागृत !! प्राप्य वरान्निबोधत !!!

कठोपनिषद् ३-१४.

उठा ! जागे व्हा !! आणि श्रेष्ठ महात्म्यांकडे जाऊन ज्ञानप्राप्ति करून घ्या !!!

( १ ) सुलभ दासबोध व समर्थ-रत्न-संग्रह प्रसिद्ध करून महाराष्ट्र-वाचकांची सेवा करण्यास आरंभ केला. दोन्हीं पुस्तकें समर्थभक्तांना व महाराष्ट्र-वाचकांना पसंत पडून त्यांनीं सामान्य मराठी वाचकांकरितां व विशेषतः मुलामुलींकरितां बालबोध समर्थवाङ्मयमाला सुरू करावी अशा सूचना केल्या. त्याप्रमाणें मालेचें १ लें पुष्प " समर्थांची करुणापर कविता " व दुसरें पुष्प " समर्थ-

सुभाषित " अशीं दोन्हीं पुस्तकें शके १८४८ सालीं प्रसिद्ध झालीं. दोन्हीं पुष्पांचा परिमल महाराष्ट्र-जनतेस आवडला हें पाहून आनंद वाटतो. आम्हीं प्रसिद्ध केलेल्या सर्व पुस्तकांस लोकाश्रय व शालाश्रय चांगलें मिळाल्यामुळें सर्व पुस्तकांच्या द्वितीयावृत्ति लवकर निघणार आहेत. तरी कोणा वाङ्मय-भक्तांस अगर शिक्षकांस कांहीं सूचना करणें असल्यास त्या लवकर करण्याची कृपा करावी.

( २ ) समर्थांच्या उपदेशामध्यें, वाणीमध्यें, ग्रंथांमध्यें एक प्रकारचें विशिष्ट दिव्य तेज आहे. २५० वर्षांपूर्वी कर्तव्यमूढ असलेला महाराष्ट्र समर्थांनीं आपल्या ओजस्वी व तेजस्वी उपदेशानें, वाणीनें व ग्रंथानें कर्तव्यनिष्ठ करून शककर्ते श्रीशिवाजी महाराजांना स्वराज्यस्थापनेस साहाय्य केलें. समर्थांचें ब्राह्मतेज व शिवाजी महाराजांचें क्षात्रतेज यांचा समागम म्हणजे कालिदासानें म्हटल्याप्रमाणें वारा आणि अग्नि यांचा समागम होय. ( पवनाग्निसमागमोऽह्यं सहितं ब्रह्म यदस्त्रतेजसा ॥ रघुवंश.) ब्रह्मतेज व क्षात्रतेज एक झाल्याशिवाय राष्ट्रोन्नति होणें अशक्य आहे; हें इतिहासाचें सर्वसंमत तत्त्व मनांत आणून महाराष्ट्रांतील ब्राह्मण-ब्राम्हणेतर वागतील, तर महाराष्ट्राचा व भरतभूमीचा अभ्युदय होण्यास उशीर लागणार नाहीं.

( ३ ) समर्थांच्या उपदेशामध्यें विशिष्ट प्रकारचें दिव्य तेज असण्याचें कारण -त्यांच्या उपदेशामध्यें प्रवृत्ति-निवृत्तीचें, प्रपंच-परमार्थाचें, अध्यात्म-व्यवहाराचें मधुर मीलन आहे. समर्थपूर्व-कालीन साधुसंतांचा विशेष भर निवृत्तिमार्गाकडे असे, तर समर्थांनीं "प्रवृत्ति सासुरे निवृत्ति माहेर । तेथें माझें मन घेत असे ॥ "

अशी गर्जना करून महाराष्ट्रसमाज केवळ निवृत्ति-मार्गापासून निवृत्ति-पूर्वक प्रवृत्तिमार्गाकडे लावला. आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका ॥ असा उपदेश करून समर्थांनीं महाराष्ट्र-जनतेस राजकारण-प्रधान प्रपंच व अध्यात्मप्रधान परमार्थ शिकवून इह-लोक व परलोक या उभयतांचें सार्थक करण्यास प्रवृत्त केलें. (प्रपंचीं पाहिजे राजकारण । परमार्थीं साकल्य विवरण ॥)

( ४ ) समर्थांच्या उपदेशामध्यें विशिष्ट प्रकारचें दिव्य तेज असण्याचें दुसरें कारण " आधीं केलें मग सांगितलें " हा त्यांचा दंडक हें होय.

सांगोंची जाणते सर्वै । कर्ता कोणी दिसेचिना ॥
जाणते नेणते सांगों । स्वभाव लागला जनीं ॥ १ ॥
करंटे मिळाले सर्वै । जो तो बुद्धीच सांगतो ॥

अशा प्रकारची समाजस्थिति समर्थांना आढळून आली. तेव्हां इतर लोकांना उपदेश करण्याचें सोडून "सांगावें तें आपणांला । आपणू करितां बरें ॥ २ ॥" हा मार्ग त्यांनीं स्वीकारला व नंतर लोकांना उपदेश करतेवेळीं:–हें प्रचीतीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ॥ मानलें तरी पाहिजे घेतलें ॥ कोणीएकें ॥ (११·१० २३), असें बोलण्याचा त्यांना अधिकार प्राप्त झाला. भगवंतांनीं अर्जुनास १८ अध्याय गीता सांगितल्या-वर शेवटीं:–इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया। विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ (१८-६१) ह्मणजे याप्रमाणें गुह्यांतलें गुह्य असें हें ज्ञान तुला मी सांगितलें, याचा पूर्ण विचार करून तुझ्या इच्छेस येईल तें तूं कर असें त्यास सांगितलें. त्याप्रमाणें समर्थ महाराष्ट्र-जनतेस म्हणतात:–मी प्रचीति घेऊन आधीं स्वतः त्याप्रमाणें करून नंतर सांगत आहें; तरी देखील विचार करून तुम्हांला मानलें-पटलें तर तुम्हीं त्याप्रमाणें वागा. भगवंतांच्या उप-देशाचा अर्जुनाच्या मनावर योग्य तो परिणाम होऊन तो जसा स्वधर्मानें प्राप्त झालेलें कर्म करण्यास प्रवृत्त झाला, त्याप्रमाणें समर्थांचा प्रचीतिपूर्वक उपदेश ऐकून महाराष्ट्र–

समाज, स्वधर्म व स्वदेश यांविषयीं आपलें कर्तव्य करण्यास तयार झाला.

(५) यावरून "आधीं केलें मग सांगितलें" ही समर्थांच्या उपदेशाची व ग्रंथाची गुरुकिल्ली आहे हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. रामायणाशिवाय समर्थांचे बहुतेक सर्व ग्रंथ स्वतंत्र आहेत व ते त्यांनीं कर्तव्यमूढ महाराष्ट्रजनतेस कर्तव्यनिष्ठ करण्यास लिहिले आहेत व आधीं केलें मग सांगितलें ही त्यांच्या सर्व उपदेशपर ग्रंथांची गुरुकिल्ली असल्यामुळें त्यांचे सर्व उपदेशपर ग्रंथ आत्मचरित्रात्मक आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुप्रसिद्ध समर्थवाङ्मयभक्त श्रीयुत शंकर श्रीकृष्ण देव हे दासबोधाच्या प्रस्तावनेंत म्हणतातः—श्रीसमर्थांचें आत्म-चरित्र म्हणजे श्रीमद्दासबोध हा ग्रंथ होय. दासबोधांत समर्थांनीं आपलें स्वतःचें चरित्र वर्णिलें आहे. आपण कशा रीतीनें वागलों हें सर्व त्यांनीं दासबोधांत लिहून ठेवलें आहे. कोणत्या विवक्षित प्रसंगीं आपण कसें वागलों हें त्यांनीं जरी सांगितलें नाहीं तरी स्वतःच्या चरित्राचें सामान्य धोरण कसें होतें याचें विस्तृत वर्णन त्यांनीं करून ठेविलें आहे." श्रीयुत देव दासबोधासंबंधानें जें म्हणतात तें समर्थांच्या दासबोधेतर ग्रंथांसहि लागू आहे. म्हणजे दास-

बोधेतर ग्रंथांतहि समर्थांनीं स्वतःच्या चरित्राचें सामान्य धोरण कसें होतें याचें विस्तृत वर्णन करून ठेविलें आहे.

( ६ ) स्पष्टीकरणाकरितां कांहीं उदाहरणें देतों. दशक ११ समास ३ "शिकवणनिरूपण" यांत समर्थ म्हणतातः-

प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें ॥
यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ॥ १ ॥
मग दिशेकडे जावें । जें कोणासीच नव्हे ठावें ॥

... ... ... ...

मुखमार्जन प्रातःस्नान । संध्या तर्पण देवतार्चन ।
पुढें वैश्वदेवउपासन । यथासांग ॥ २ ॥
पुढें भोजन झालियावरी । कांहीं वाची चर्चा करी ॥
एकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ॥ ३ ॥

पुन्हा द. १२ समास ९ " यत्न शिकवण " यांत समर्थ म्हणतातः—

प्रातःकाळीं उठावें । प्रातःस्मरामि करावें ॥
नित्यनेमें स्मरावें । पाठांतर ॥ १ ॥
मागील उजळणी पुढें पाठ ॥ नेम धरावा निकट ॥

... ... .... ...

कांहीं फळाहार घ्यावा । पुढें व्यवसाय करावा ॥

... ... ... ...

जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ॥
मग महंतलीला स्वभावें । अंगीं बाणे ॥

या दोन समासांतील वरील त्रोटक उताऱ्यांवरून कोणी समर्थ-चरित्र-लेखक समर्थांची दिनचर्या खालीलप्रमाणें होती असें समर्थांच्याच शिकवणीवरून म्हणेल तर तें साधार होणार आहे. समर्थांची दिनचर्या— " समर्थ प्रातःकाळीं उठत असत. नंतर प्रातःस्मरण करीत असत. नंतर कांहीं पाठांतर करीत व पाठांतर करितांना प्रथम मागील उजळणी करीत. नंतर लांब बहिर्दिशेस जात. परत आल्यावर मुखमार्जन करून प्रातःस्नान करीत. नंतर संध्या, तर्पण, देवपूजा व वैश्वदेव करीत. नंतर कांहीं फलाहार करून नित्य व्यवसायास लागत. ज्याप्रमाणें ते बोलत त्याप्रमाणें ते वागत. म्हणून महंत ही पदवी त्यांना सहज प्राप्त झाली. "

( ७ ) वरील विवेचनावरून समर्थ आपल्या उपदेशांत व ग्रंथांत " प्रातःकाळीं उठावें । " " प्रभाते मनीं राम चिंतीत जावा " इत्यादि जें सांगत त्याप्रमाणें त्यांचें स्वतःचें वर्तन असे, असा सर्वसाधारण नियम समजण्यास कांहीं हरकत नाहीं. त्याचप्रमाणें मनाच्या श्लोकांत—

सदा देव-काजीं झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

हा श्लोक व पुढील नऊ श्लोक या "समर्थांच्या आत्म-चरित्रांत" दिले आहेत ते समर्थांच्या आत्मचरित्रपरच आहेत असें बिनचुक अनुमान करण्यास हरकत नाहीं.

(८) दासबोधांत क्वचित् समर्थांनीं प्रत्यक्ष आत्म चरित्र दिलें आहे—द. १० स. ७ 'सगुण भजन' यांत समर्थ म्हणतात—

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ॥
जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडाविता ॥ १ ॥
त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां झालें ज्ञान ॥
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ॥ २ ॥

.... ... ... ...

रघुनाथभजनें ज्ञान झालें । रघुनाथभजनें महत्त्व वाढलें ॥
म्हणोनियां तुवां केलें । पाहिजे आधीं ॥ ३ ॥
रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळचि सिद्धि पावे ॥
कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं ॥ ४ ॥

मी कर्ता ऐसें ह्मणसी । तेणें तूं कष्टी होसी ॥
राम कर्ता म्हणतां पावसी । यश कीर्ति प्रताप ॥ ५ ॥

"आमचे कुळांत श्रीरघुनाथ कुलदैवत आहे. रघुनाथ-सेवेनें-रघुनाथभजनानें मला ज्ञान प्राप्त झालें. रघुनाथ-भजनानें माझी महती वाढली. ह्मणून हे शिष्या, तूं प्रथम रघुनाथभजन केलें पाहिजेस. रघुनाथाचें स्मरण करून व कर्ता श्रीराम आहे अशी अंतःकरणांत भावना धरून काम केल्यास तत्काळ कार्यसिद्धि होते. हे शिष्या, मीच कर्ता अशी आढ्यता धरून काम करशील तर तुला फार कष्ट होतील. श्रीराम कर्ता-करविता-आहे अशी भावना धरून कार्य करशील तर ( माझ्याप्रमाणें ) यश, कीर्ति, प्रताप प्राप्त होतील." या प्रमाणें वरील पांच ओंव्यांत समर्थांनीं आत्मचरित्र कथन केलें आहे.

( ९ ) दासबोधेतर ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं समर्थांनीं प्रत्यक्ष आत्मचरित्र दिलें आहे.

(अ) साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्य दैवत श्रीरघुनाथ ॥
गुरू श्रीरामसमर्थ । काय उणे दासासी ॥ १ ॥

( आ ) ब्रह्मदेवें केला उपदेश वसिष्ठा ।
तेथें धरा निष्ठा शुद्ध भावो ॥

वसिष्ठ उपदेशी श्रीरामरायासी ।
**रामें रामदासीं उपदेशिलें ॥ २ ॥**
उपदेश देवोनि दिधला मारुति ॥
स्वयें रघुपति निरविता ॥ ३ ॥
निरवितां तेणें झालों रामदास ।
संसारीं उदास म्हणोनियां ॥ ४ ॥

( ३ ) कलीमाजीं गोदातीरीं पुण्यक्षेत्र ।
तेथें वातपुत्र अवतरे ॥ १ ॥
अवतरे अभिधानी रामदास ।
कृष्णातीरीं वास जगदुद्धारा ॥ २ ॥
भक्तिपंथें मोठा केला श्रीरामानें ।
जंबू अभिधानें ग्राम तेथें ॥ ३ ॥
तेथें ब्रह्मनिष्ठ अधिष्ठाता पूर्ण ।
सूर्यनामा जाण द्विजवर्य ॥ ४ ॥
द्विजवर्य सूर्य जैसा तपोधन ।
अद्भुत विंदान झालें तेथें ॥ ५ ॥
तया दिला वर तुज पुत्र होतील ।
ध्वज उभारतील रामदास्यें ॥ ६ ॥
झाली रामनवमी महोत्सव थोर ।
मध्यान्हीं सत्वर जन्म झाला ॥ ७ ॥

वरील उद्‌घृत ओव्यांमध्यें समर्थांनीं बरेंच आत्मचरित्र दिलें आहे. गोदातीरीं जंबू (जांब) नांवाचें पुण्यक्षेत्र होतें. तेथें सूर्याजीपंत नांवाचे तपोनिष्ठ द्विजवर्य रहात असत. त्यांना रामनवमीचे दिवशीं मध्यान्हीं रामजन्माचे वेळीं महोत्सव चालला असतां पुत्र झाला. तो वायुपुत्राचा अवतार होता. त्याचें नांव रामदास. नंतर जगदुद्धाराकरितां त्यानें कृष्णातीरीं वास केला इत्यादि. दासबोधेतर आत्मचरित्रांत " समर्थांचें महंतांस पत्र, " " समर्थांचें शिवाजीस पत्र, " " पंचवटीच्या रामोपासकांना पत्र " इत्यादि पुष्कळ ठिकाणीं समर्थांनीं प्रत्यक्ष आत्मचरित्र दिलें आहे. त्याचा समर्थ–चरित्रकारास फार उपयोग होणार आहे.

( १० ) श्रीकाशी येथील हिंदु विश्वविद्यालयांत दासनवमीस श्रीसमर्थचरित्रावर इंग्रजींत भाषण करण्याचा गतवर्षीं योग आला होता. त्या वेळीं समर्थांविषयीं महाराष्ट्राबाहेरील सुशिक्षितांमध्यें फार आदर आहे असें आढळून आलें. सुप्रसिद्ध वयोवृद्ध विद्वद्वर्य राष्ट्रभक्त पंडित मदनमोहन मालवीय यांनीं तर समर्थचरित्र ऐकण्याची फारच उत्कंठा प्रदर्शित केली. I have a great curiosity to know the life of Ramadas, the great preceptor of Shivaji-the Founder of the Maratha Empire.

'मराठा साम्राज्याचे संस्थापक शिवाजीमहाराज यांचे महनीय गुरु रामदासस्वामी यांचें चरित्र ऐकण्याची मला फार उत्कंठा आहे' असें ते म्हणाले. त्यांनीं व हिंदु विश्व-विद्यालयाच्या कांहीं गुरुवर्यांनीं ( प्रोफेसरांनीं ) रामदास-स्वामींचें एक इंग्रजी चरित्र लिहिण्याची सूचना केली.

( ११ ) " श्रीसमर्थांचें चरित्र लिहिण्याची वेळ अजून आली नाहीं. चरित्र लिहिण्यास आवश्यक अशी साधन-सामुग्री अद्यापि कितीतरी मिळवावयाची राहिली आहे " असें श्री. शंकर श्रीकृष्ण देव " श्रीसमर्थांचें आत्मचरित्र केव्हां लिहावें " या निबंधांत लिहितात. सदर्हू निबंध त्यांनीं रामदास आणि रामदासी या मालेचा १५ वा भाग " श्री सांप्रदायिक विविध विषय " यांत लिहिला आहे. ( पान १६२–१६५). सदर्हू निबंधांत समर्थ–चरित्राच्या साध-नांकरितां कोठें कसा शोध करावा याची श्री. देव यांनीं सविस्तर माहिती दिली आहे. सदर्हू निबंधांत लिहिलेल्या अनेक ठिकाणीं जाऊन संशोधन करून माहिती मिळवावी व ती आपल्याकडे पाठवावी अशी श्री. देव यांनीं रामदास व रामदासी या मालेच्या वाचकांस विनंति केली होती. त्याप्रमाणें कोणी माहिती पाठविल्याचें दिसत नाहीं. प्रस्तुत लेखकानें कांहीं ठिकाणीं जाऊन शोध केला, परंतु सदर्हू

ठिकाणीं " श्री. राजवाडे, श्री. देव पूर्वीच येऊन गेले " असें सांगण्यांत आलें ! ! तेव्हां समर्थ वाङ्मयाचेंच एक वेळ पारायण करून त्यांतून आत्मचरित्रपर भाग **प्रथम** प्रसिद्ध करावा असें वाटलें. व तदनुसार हा अल्प प्रयत्न करून महाराष्ट्र-वाचकांस सादर केला आहे.

( १२ ) समर्थांनीं महाराष्ट्रास धर्ममूलक विवेक-वैराग्य-प्रधान प्रयत्नवाद अगर महाराष्ट्र-धर्म शिकवून सर्व महाराष्ट्र २५० वर्षांपूर्वी कर्तव्यनिष्ठ बनविला. त्यामुळें तत्कालीन महाराष्ट्र-जनतेस स्वधर्म-स्वराज्य-वृक्षाच्या अमृततुल्य फलांचा आस्वाद घेण्यास मिळाला. समर्थ-वाङ्मयांतील तत्त्वें व उपदेश त्रिकालाबाधित आहेत. कोणत्याही देशांत कोणत्याही काळीं जनतेनें समर्थ वाङ्मयाचें अध्ययन करून त्याप्रमाणें आचरण केल्यास त्या देशाचा अभ्युदय होऊन इष्टफलप्राप्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं. समर्थांचें चरित्र सर्व राष्ट्रांना सर्व काळीं आदर्शभूत आहे. तेव्हां त्यांचें आत्मचरित्र त्यांच्याच स्फूर्तिदायक, दिव्य व ओजस्वी भाषेंत महाराष्ट्र वाचकांपुढें-विशेषतः तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींपुढें ठेवल्यास मता-मतांच्या गलबल्यांत सांपडलेला महाराष्ट्र पक्षोपपक्ष व ब्राह्मणब्राह्मणेतर हा भेद विसरून श्री. शिव-समर्थकाला-

प्रमाणें सदैव मनांत बंधुभाव ठेवून कर्तव्यनिष्ठ होईल या हेतूनें हें समर्थांचें आत्मचरित्र प्रसिद्ध केलें आहे. सुशिक्षित बंधुभगिनींनो–व विद्यार्थी--विद्यार्थिनींनो ! उठा ! ! जागे व्हा ! ! ! समर्थांच्या आत्मचरित्राचें वाचन, मनन करा व समर्थांची ओजस्वी व तेजस्वी शिकवण नित्य आचरणांत आणून आपला स्वतःचा, महाराष्ट्राचा व भरतभूमीचा उद्धार करा ! ! ! जय जय रघुवीर समर्थ ! !

कऱ्हाड,<br>ज्येष्ठ शु. १३ शके १८५०. } **सदाशिव खंडो आळतेकर.**

# समर्थांचें अतिसंक्षिप्त चरित्र.

मोंगलाईंत राक्षसभुवनापासून वीस कोसांवर औरंगाबाद जिल्ह्यांत आंबड परगण्यांत गोदावरी नदीच्या कांठीं जांब नांवाचें गांव आहे. तेथें शके १५२० सालीं चैत्र शुद्ध नवमीचे दिवशीं रामजन्माचे वेळीं समर्थांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचें नांव **सूर्याजीपंत** कुळकर्णी, उपनांव ठोसर; ते जमदग्निगोत्री ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. ते सूर्यो-पासक होते. समर्थांच्या आईचें नांव **राणुबाई.** समर्थांचें मूळ नांव नारायण होतें. ते रामाची उपासना करूं लागले ह्मणून पुढें त्यांना रामदास ह्मणूं लागले. समर्थांच्या वडिल बंधूंचें नांव गंगाधर. त्यांनाच पुढें रामीरामदास व श्रेष्ठ म्हणूं लागले. श्रेष्ठांचा जन्म शके १५२७ सालीं झाला. हल्लींचे चाफळचे स्वामी हे श्रेष्ठांचे वंशज आहेत. समर्थांचें लग्न त्यांच्या बाराव्या वर्षीं म्हणजे शके १५४२ सालीं ठरलें होतें. लग्नाच्या वेळीं वधूवरांमध्यें अंतरपाट धरून ब्राह्मण सुमुहूर्त सावधान म्हणत असतां समर्थ सावध होऊन लग्न-समारंभांतून पळून पंचवटीस गेले व तेथें त्यांनीं बारा वर्षें पुरश्चरण केलें.

शके १५५४ नंतर बारा वर्षें सर्व भरतखंडांत तीर्थयात्रा करून शके १५६६ सालीं समर्थ कृष्णातीरीं आनंदभुवनांत आले. १५६७–७२ पर्यंत समर्थांनीं बारा मारुती स्थापन केले व चाफळ येथें श्रीरामउत्सवास सुरवात झाली. नाशकापासून कोल्हापुरापर्यंतच्या महाराष्ट्रास समर्थ आनंदभुवन ह्मणतात. बारा वर्षांच्या प्रवासांत त्यांना हिंदुधर्माची व हिंदु समाजाची हीन स्थिति झालेली आढळून आली. त्याचें वर्णन त्यांनीं दासबोधांत कांहीं समासांत व स्फुटकाव्यांतहि केलें आहे. तीर्थयात्रा करून महाराष्ट्रांत परत आल्यावर ठिकठिकाणीं मठ स्थापून समर्थांनीं धर्मसंस्थापना करण्यास सुरवात केली. मारुतीचीं व रामाचीं देवालयें स्थापून हनुमज्जयंतीचे व रामजयंतीचे उत्सव सुरू करून लोक सदाचरणाकडे लावले. "स्वयें करुनी बोलणें" अशी त्यांची पद्धत असल्यामुळें "नभामाजी तारांगणें" असा त्यांना शिष्यवर्ग मिळाला. शिवाजीमहाराजांची समर्थांच्या शिष्यांत गणना आहे. शिवाजीमहाराजांनीं सर्व राज्य समर्थांच्या झोळींत भिक्षेस घातलें; समर्थांनीं राज्य परत देऊन भगव्या रंगाचें निशाण ठेवण्यास सांगितलें. मराठ्यांचा "भगवा झेंडा" इतिहासप्रसिद्ध आहे. समर्थांनीं अकराशें मठ स्थापन केले. चाफळ हें सर्व मठांचें आदि-

पीठ; तेथें खुद्द समर्थ बरेच दिवस राहात असत. नंतर शिवाजीमहाराजांच्या विनंतिवरून साताऱ्यानजीक परळीस राहूं लागले ह्मणून परळीस सज्जनगड हें नांव पडलें. येथें १६०२ सालीं माघ वद्य नवमीस समर्थांनीं समाधी घेतली.

---

ग्रंथ संग्रहालय
क्रमांक २९५
पुणे.

# समर्थांचे मठ-महंत व शिष्य

समर्थांनीं सर्व महाराष्ट्रांतच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरहि धर्मजागृति उत्पन्न करून बहुजनसमाजास कर्तव्यदक्ष करून सन्मार्गाला लावलें. श्री. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम प्रभृति संतश्रेष्ठांनींहि समर्थांच्या पूर्वी लोकजागृति करून बहुजन समाजाला सन्मार्गाला लावण्याचें श्रेय संपादन केलें होतें; परंतु समर्थांप्रमाणें वरील पूज्य साधुश्रेष्ठांनीं मठ स्थापन करून महंतांकडून शिष्यवर्ग तयार करण्याचा संप्रदाय अमलांत आणला नव्हता. समर्थांच्या शिकवणींत 'राजी' राखून इष्ट कार्य करण्यास जागोजागीं उपदेश केला आहे. वर्तायाचा विवेक। राजी राखणें सकळ लोक। हळूहळू पुण्यश्लोक। करीत जावे ॥ १३।१०।१७. लोकांचें मनोगत राखून " नभामाजी तारांगणें " असा शिष्यसमुदाय करण्यास जागजागीं मठ स्थापन करण्याची समर्थांना आवश्यकता भासली. त्याप्रमाणें त्यांनीं सर्व भरतखंडांत मठस्थापना केली. रामेश्वरापासून बद्रीकेदारापर्यंत व द्वारकेपासून रामटेकपर्यंत सर्व प्रसिद्ध क्षेत्रीं समर्थांचे मठ व महंत होते. समर्थांनीं स्थापिलेल्या प्रत्येक मठांत महंत अगर मठपति असून मुख्य मठांत मठपति

ब्रह्मचारी असत. समर्थ परीक्षा घेऊन महंत नेमीत असत. समर्थांची शिक्षा कडक असे. समर्थांचा धकाधकीचा मामला असे व तो अशक्ताला सहन होत नसे. समर्थ आपल्या वयाच्या ६७ व्या वर्षी हेळवाकपासून चाफळा-पर्यंत घोड्यावर भरधांव बसून आले होते यावरून त्यांची शरीरयष्टी किती बळकट होती याचें अनुमान करतां येईल. समर्थांचे कांहीं प्रसिद्ध मठ व मठपति:—

१।२ चाफळ व सज्जनगड-खुद्द समर्थ, ३ डोमगांव-कल्याण, ४ शिरगांव-दत्तात्रेय-कल्याणांचे धाकटे बंधु, ५ रामेश्वर-हनुमान, ६ बद्रीकेदार-दयाळ, ७ प्रयाग, वेणीमाधव, ८ अयोध्या-रामकृष्ण, ९ मथुरा-हरिकृष्ण, १० रामटेक-श्रीधर, ११ सोमनाथ-विश्वंभर, १२ कांची-भगवंत, १३ ओंकारेश्वर-ब्रह्मदास, १४ द्वारका-हरि, १५ काशी-रामचंद्र, १६ गोकर्ण-भैरव, १७ श्रीरंगपट्टण-शंकर, १८ पंढरपूर-अनंत, १९ कण्हेरी-वासुदेव, २०।२१ टाकळी व इंदूर-उद्धव, २२ हरिद्वार-जयकृष्ण, २३ अवंतिका-रघुनाथ, २४ श्रीशैल्यशिखर, २५ औदुं-बर-हरिदास इत्यादि. मठपति महंत-शिष्य-प्रशिष्यां-शिवाय तत्कालीन राजकार्यधुरंधर पुरुषांमध्येंही समर्थांचे पुष्कळ शिष्य होते.

१ श्रीशिवाजीमहाराज, २ रामचंद्रपंत अमात्य, बाळाजीपंत चिटणीस, ४ निळोपंत मुजुमदार, ५ अंताजीपंत वाकनीस, ६ नरसोपंत अंबरखाने, ७ गणेशपंत रायगडकर, ८ नारायणपंत विजापूरकर, ९ रामकृष्णपंत देवगिरीकर, १० बाळकृष्णपंत शाहापूरकर इत्यादि.

समर्थांच्या कांहीं शिष्यिणी होत्या:—१ वेणाबाई, ह्या सर्वांत प्रसिद्ध आहेत. त्यांनीं ग्रंथरचनाहि केली आहे. त्यांचें सीतास्वयंवर सुप्रसिद्ध काव्य आहे. त्या मिरजेस राहात. त्यांच्याहि कांहीं शिष्यिणी होत्या. वेणाबाईची समाधि सज्जनगडावर आहे. वेणाबाईच्या शिष्यीण बाईयाबाई, त्यांचे शिष्य समर्थप्रतापकर्ते गिरिधर. २ चिमणाबाई ऊर्फ आक्का यांची समाधि सज्जनगडावर आहे. यांच्या खटपटीमुळें चाफळ व सज्जनगड येथील देवस्थानची व्यवस्था समर्थांनंतर चांगली चालली. ३ अंबिकाबाई रा. करवीर. ४ सतीबाई रा. शाहापूर. ५ नवाबाई रा. तापीतीर, इत्यादि.

रा. क्र. 3620 / 60
॥ श्री ॥

# समर्थ-वाङ्मयमाला

## पुष्प ३ रें

# समर्थांचें आत्मचरित्र

( भाग १ ला—दासबोधांतर्गत )

### दशक ६ समास ७

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ॥
जो समर्थाचाही समर्थ । देवा सोडविता ॥१॥
त्याचे आम्ही सेवकजन । सेवे[1]-करितां झालें ज्ञान ॥
तेथें अभाव[2] धरितां पतन । पाविजेल कीं ॥२॥
मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ॥
विचार पाहतां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ॥३॥
तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें ॥
तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ॥४॥

---

१ सेवा केल्यानें २ अविश्वास.

मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें ।
कृपा केलिया रघुनाथें । प्रचीत येते ॥५॥
रघुनाथभजनें ज्ञान झालें । रघुनाथभजनें महत्व वाढलें॥
ह्मणोनियां तुवां केलें । पाहिजे आधीं ॥६॥
हें तो आहे सप्रचित । आणि तुज वाटेना प्रचित ॥
साक्षात्कारें नेमस्त । प्रत्ययो करावा ॥७॥
रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळचि सिद्धी पावे॥
कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं ॥८॥
कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुण-निवेदन ॥
निर्गुणीं ते अनन्य । निर्गुणचि होईजे ॥९॥
मी कर्ता ऐसें ह्मणतां । कांहींच घडेना सर्वथा ॥
प्रचित पाहसी तरी आतां । शीघ्रेंचि पाहें ॥१०॥
मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी ॥
राम कर्ता ह्मणतां पावसी । यश कीर्ती प्रताप ॥११॥
याकारणें रघुनाथ-भजन । त्यासि मानिती बहुत जन ॥
ब्रह्मादिक आदिकरून । रामभजनीं तत्पर ॥१२॥
ज्ञानबळें उपासना । आह्मी भक्त जरी मानूना ॥
तरी या दोषाच्या पतना । पावों अभक्तपणें ॥१३॥

---

१ प्रत्ययानें सिद्ध २ निश्चयानें ३ मनांत ४ एकनिष्ठ
५ तत्काळ—लागलीच.

## दशक ११ समास ३ शिकवणनिरूपण

प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर[1] करावें ॥
यथानुशक्ती आठवावें । सर्वोत्तमासी ॥ १ ॥
मग दिशेकडे[2] जावें । जे कोणासीच नव्हे ठावें ॥
शौच आचमन करावें । निर्मळ जळें[3] ॥ २ ॥
मुखमार्जन[4] प्रातःस्नान ॥ संध्या तर्पण[5] देवतार्चन ॥
पुढें वैश्वदेव उपासन । यथासांग ॥ ३ ॥
कांहीं फळाहार[6] घ्यावा । मग संसारधंदा करावा ॥
सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ ४ ॥
ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबरदार ॥
दुश्चितपणें[7] तरी पोर । वेढा लावी[8] ॥ ५ ॥
चुके ठके विसरे सांडी । आठवण झालिया चर्फडी ॥
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचीत पहा ॥ ६ ॥
या कारणें सावधान । सदा एकाग्र[9] असावें मन ॥
तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ ७ ॥
पुढें भोजन झालियावरी । कांहीं वाची चर्चा[10] करी ।
एकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ॥ ८ ॥

---

१ ग्रंथवाचन २ बहिर्दिशेकडे ३ पाण्यानें ४ तोंड धुणें ५ पितृतर्पण ६ फळें खाणें ७ गैरसावधपणानें ८ फसवितें ९ अव्यग्र-सावध १० मनन करी.

तरीच प्राणी शहाणा होतो । नाहीं तरी मूर्खच राहतो ॥
लोक खातीं आपण पाहतो । दैन्यवाणा ॥ ९ ॥
ऐक सदैवपणाचें[१] लक्षण । रिकामा जाऊं नेदी क्षण ॥
प्रपंच व्यवसायाचें[२] ज्ञान । बरें पाहे ॥ १० ॥
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्यां[३] लोकांस उगवी ॥
शरीर कारणीं[४] लावी । कांहीं तरी ॥ ११ ॥
कांहीं धर्मचर्चा[५] पुराण । हरिकथा निरूपण ॥
वायां जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥ १२ ॥
ऐसा जो सर्वसावध । त्यास कैंचा असेल खेद ।
विवेकें तुटला संबंध । देहबुद्धीचा ॥ १३ ॥
आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें ॥
मूळ तुटे उद्वेगाचें । येणें रीति ॥ १४ ॥
प्रपंचीं पाहिजे सुवर्ण[६] । परमार्थी पंचीकरण ॥
महावाक्यांचें[७] विवरण । कारितां सुटे ॥ १५ ॥
कर्मउपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान ॥
परमार्थाचें साधन । तेंचि ऐकांत जावें ॥ १६ ॥

### दशक १९ समास १० निस्पृहवर्तणूक.

मूर्ख एकदेशी[८] होतो । चतुर सर्वत्र पाहतो ॥
जैसा बहुधा होउनी भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥

---

१ भाग्यवंताचें २ उद्योगाचें ३ संकटात पडलेल्या ४ सार्थकीं ५ अद्वैत-चर्चा ६ सोनें ७ अहं ब्रह्मास्मि इत्यादि वेदवाक्यांचें ८ एकांगी.

तांचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित ॥
प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ॥ २ ॥
कर्ता भोक्ता तत्वता । भूमंडळीं सर्व सत्ता ॥
त्या वेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कर्वणु ॥ ३ ॥
ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ॥
पाहों जातां न सांपडावें । एकाएकीं ॥ ४ ॥
कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाणती लहान थोर समस्त ॥
वेष पाहतां शाश्वत । एकही नाहीं ॥ ५ ॥
वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण ।
चाळणेवीण एक क्षण । जाऊंच नेदी ॥ ७ ॥
त्यागी ओळखींचे जन । सर्वकाळ नित्य नूतन ॥
लोक शोधूनि पाहती मन । परी इच्छा दिसेना. ॥८॥
पुर्तें कोणाकडे पाहेना । पुर्तें कोणासी बोलेना ॥
पुर्ते एके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥९ ॥
जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें तरी जायेना ।
आपुली स्थिती अनुमाना । येवोंच नेदी ॥ १० ॥
--लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर ॥
लोक सर्वकाळ तत्पर तेथें याची अनिच्छा ॥ ११ ॥

---

१ कोण २ तात्पर्य ३ पोषाख ४ मनन, विचार ५ सोडी ६ कंटाळा.

एवं कल्पितां कल्पेना । ना तर्कितां हि तर्केना ॥
कदापी भावितां भावेना[1] । योगेश्वर ॥ १२ ॥
ऐसें अंतरें[2] सांपडेना । शरीर ठायीं पडेना ॥
क्षण एक विसंबेना[3] । कथा कीर्तन ॥ १३ ॥
लोक संकल्प[4] विकल्पें[5] करिती । ते अवघेची निर्फळ होती ॥
जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ॥ १४ ॥
बहुतीं शाधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ॥
तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ १५ ॥
अखंड एकान्त सेवावा । अभ्यासचि करीत जावा ॥
काळ सार्थकाचि करावा । जनासहित ॥ १६ ॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊनि जनास शिकवावे ॥
उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपें[6] ॥ १७ ॥
अखंड कामाची लगबग[7] । उपासनेस[8] लावावें जग ॥
लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ १८ ॥
आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं ते निर्फळ ॥
साक्षेपे[9]-वीण केवळ । वृथा[10] पुष्ट ॥ १९ ॥

---

१ भावना करतां येत नाहीं २ मनोगत ३ विसरत नाहीं ४ चांगली कल्पना ५ वाईट कल्पना ६ कळूं न देतां ७ त्वरा--घाई ८ भजनमार्गास ९ साक्षेप=प्रयत्न, उद्योग १० काम न करून लठ्ठ.

लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ॥
जाणजाणोन धरावे । जवळी दुरी ॥ २० ॥
अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां व्यर्थ जातें ॥
जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारें ॥ २१ ॥
अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें
आपला मगज राखणें । कांहींतरी ॥ २२ ॥
हें प्रचीतीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ॥
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीएकें ॥ २३ ॥
महंतें[1] महंत करावे । युक्ति-बुद्धीनें भरावे[2] ॥
जाणते करून विखरावे[3] । नाना देशीं ॥ २४ ॥

## दशक ११ समास ५ राजकारण

कर्म[4] केलेंचि करावें । ध्यान[5] धरिलेंचि धरावें ॥
विवरिलेंचि विवरावें । पुन्हां निरूपण ॥ १ ॥
अनन्य[6] राहे समुदाव । इतर जनास उपजे भाव ॥
ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा[9] ॥ २ ॥
मुख्य हरिकथा-निरूपण । दुसरें तें राजकारण ॥
तिसरें तें सावधपण । सर्वविषयीं ॥ ३ ॥

---

१ महत्त्व २ त्यांच्यामध्यें युक्तिबुद्धि भरावी ३ पसरावे ४ कर्तव्य कर्म ५ उपास्य देवतेचें ध्यान ६ स्थिर ७ सद्भाव ८ हेतु ९ लोकहिताचा.

चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेपें[1] ॥
अन्याय थोर अथवा अल्पे[2] । क्षमा करीत जावे ॥ ४ ॥
जाणावें परांचें अंतर । उदासीनता निरंतर ॥
नीतिन्यायास अंतर । पडोंचि नेदावें ॥ ५ ॥
संकेतें[3] लोक वेधावा । एकूनएक बोधावा ॥
प्रपंचेही सांवरावा[4] । यथानुशक्त्या ॥ ६ ॥
प्रपंच-समयो[5] ओळखावा[6] । धीर बहुत असावा ॥
सबंध पडों नेदावा[7] । अति परिचयाचा ॥ ७ ॥
उपाधीस[8] विस्तारावें[9] । उपाधींत न सांपडावें ॥
नीचत्व पहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ॥ ८ ॥
दोष देखोनि झांकावें । अवगुण अखंड न बोलावे ॥
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ ९ ॥
तें[10]न्हे भरोंच नये ॥ सुचावे नाना उपाये ॥
नेन्हे[11] तेंचि करावें । कार्य दीर्घ-प्रयत्नें ॥ १० ॥
फड[12] नासोंचि नेदावा । पहिला प्रसंग सांवरावा ॥
अतिवाद न करावा । कोणीएकासी ॥ ११ ॥

---

१ शंका २ लहान ३ खुणेनें ४ आपल्याकडे ओढून घ्यावा ।
५ प्रसंग ६ जाणावा ७ देऊं नये ८ व्याप ९ वाढवावे
१० एकलकोंडेपणा ११ अशक्य, न होणारें १२ सभा.

दुसऱ्याचें अभीष्ट[1] जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें ॥
न सोसे तरी जावें । दिगंतरा[2]प्रती ॥ १२ ॥
दुसऱ्याचें दुःख जाणावें । ऐकोन तरी वाटोन घ्यावें ॥
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ १३ ॥
अपार असावें पाठांतर । सन्निधा[3]चि असावा विचार ॥
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १४ ॥
शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ॥
क्रिया करून करवावी । बहुतापरी ॥ १५ ॥
करणें असेल अपाय[4] । तरी बोलोन दाखवूं नये ॥
परस्परेंचि प्रत्यय । प्रचीतीस आणावा ॥ १६ ॥
जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ॥
बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ १७ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें ॥
परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ १८ ॥
लोक पारखून[5] सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे[6]॥
पुन्हा मेळवून घ्यावे । दुरीळ[7] दोरे ॥ १९ ॥
हिरवटांसी[8] दुरी धरावें । कचरटांसी[9] न बोलावें ॥
संबंध पडतां सोडून जावें । एकीकडे ॥ २० ॥

---

१ कल्याण २ दूरदेशीं ३ जागृत–जवळ ४ नुकसान ५ परीक्षा करून ६ अभिमान राहूं देऊं नये ७ विभक्त झालेले ८ तामसी लोकांस ९ भांडखोरांस.

ऐसें असो राजकारण । सांगतां तें असाधारण ॥
सुचित असतां अंतःकरण । राजकारण जाणे ॥ २१ ॥
वृक्षीं रूढासी उचलावें । युद्धकर्त्यांसी ढकलावें ॥
कारभाराचें सांगावें । अंग कैसें ॥ २२ ॥
पाहतां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहवेना ॥
आलें वैभवें अभिळाषीना । कांहीं केल्या ॥ २३ ॥
एकाची पाठी राखणें । एकास देखों न सकणें ॥
ऐसी नव्हेत हीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ २४ ॥
न्याय बोलतांही मानेना । हित तेंचि नये मना ॥
येथें कांहींच चाळेना । त्यागेंविण ॥ २५ ॥

## दशक ११ समास ६

शुद्ध नेटकें ल्याहावें । लेहोन शुद्ध शोधावें ॥
शोधून शुद्ध वाचावें । चुकों नये ॥ १ ॥
जाणायाचें सांगतां नये । सांगावयाचें नेमस्त नये ॥
समजल्याविण कांहींच नये । कोणीएक ॥ २ ॥
हरिकथा-निरूपण । नेमस्तपणें राजकारण ।
वर्तायाचें लक्षण । तेंहि असावें ॥ ३ ॥

---

१ झाडावर चढणाऱ्यास टेका देऊन चढवावें २ विरोध करणाऱ्यास खालीं पाडावें ३ मोठेपणा ४ इच्छींना ५ नीट-चांगलें ६ नेम घालतां येत नाहींत ७ सावधपणें ८ वागण्याचें.

पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर[1] करूं जाणे ॥
सकाळिकांचें राखों जाणे । समाधान ॥ ४ ॥
दीर्घ सूचना आधीं कळे । सावधपणें तर्क प्रबळे ॥
जाण-जाणोनि निवळे । यथायोग्यं ॥ ५ ॥
ऐसा जाणे जो समस्त । तोचि महंत बुद्धिवंत ॥
यावेगळें अंतवंत[2] । सकळ कांहीं ॥ ६ ॥
ताळवेळ[3] तानमानें । प्रबंध[4] कविता जाड वचनें[5] ।
मर्य्यालसीं[6] नाना चिन्हें । सुचती जया ॥ ७ ॥
जो एकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर ॥
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भीचें[7] ॥ ८ ॥
आधींच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठपदवी ॥
गुंतल्या लोकांस उगवी[8] । विवेकबळें[9] ॥ ९ ॥
अक्षर सुंदर वाचणें सुंदर । बोलणें सुंदर चालणें सुंदर ॥
भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करूनि दावी ॥ १० ॥
जयास यत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पैंवाडे[10] ॥
धीटपणें प्रगटे दडे । ऐसा नव्हे ॥ ११ ॥

---

१ अर्थ लावणें २ नाशवंत ३ तालसूर ४ कवित्वरचना ५ गंभीर वचनें ६ सभेंत ७ ग्रंथाच्या रहस्याचें ८ मोकळे करी ९ युक्तिच्या बळानें १० शिरतो.

सांकडीमध्यें[1] वर्तों जाणे। उपाधीमध्यें[2] मिळों जाणे ॥
अलिप्तपणें[3] राखों जाणे। आपणासी ॥ १२ ॥
आहे तरी सर्वांठायीं। पाहों जातां कोठेंचि नाहीं ॥
जैसा अंतरात्मा ठायींचा ठायीं। गुप्त झाला ॥ १३ ॥
त्या वेगळें कांहींच नसे। पाहों जातां तो न दिसे ॥
न दिसोन वर्तवीतसे[4]। प्राणिमात्रासीं ॥ १४ ॥
तैसाच हाहि नानापरी। बहुत जनास शहाणे करी ॥
नाना विद्या त्या विवरी। स्थूल[5] सूक्ष्म[6] ॥ १५ ॥
आपणाकरितां शहाणे होती। ते सहजींच[7] सोर्य धरिती ॥
जाणतेपणाची महंती[8]। ऐसी असे ॥ १६ ॥
राखों जाणे नीतिन्याय। न करी न करवी अन्याय ॥
कठिण प्रसंगीं उपाय। करूं जाणे ॥ १७ ॥
ऐसा पुरुष धारणेचा[9]। तोचि आधार बहुतांचा।
दास म्हणे रघुनाथाचा। गुण घ्यावा ॥ १८ ॥

## दशक १२ समास १ विमललक्षण

सुखी असतो खबर्दार[10]। दुःखी होतो बेखबैर[11] ॥
ऐसा हा लौकिक विचार। दिसताचि आहे ॥ १ ॥

---

१ संकटामध्यें २ व्यापामध्यें ३ असंगपणें ४ प्रतिपादन करी ५ सुगम ६ गहन ७ प्रयास न पडतां ८ महत्त्वाचीं कामें करतात ९ व्यापक बुद्धीचा १० सावध ११ गैरसावध.

म्हणोन सर्वसावधान । धन्य तयाचें महिमान ॥
जनीं राखे समाधान । तोचि एक ॥ २ ॥
चाळणेचा[1] आळस केला । तरी अवचितां[2] पडेल घाला ।
ते वेळे सांवरायाला । अवकाश कैचा ॥ ३ ॥
म्हणोन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पहावा विवेक ॥
लोकांकरितांचि लोक । शहाणे होती ॥ ४ ॥
परी ते शहाणे ओळखावे । गुणवंतांचे गुण घ्यावे
अवगुण देखोन सांडावे । जनामध्यें ॥ ५ ॥
मनुष्य पारखूं[3] राहेना । आणि कोणाचें मन तोडीना ।
मनुष्यमात्रें[4] अनुमाना । आणून पाहे ॥ ६ ॥
दिसे सकळांसी सारखा । पाहतां विवेकी नेटका ॥
कामी[5] निकामी[6] लोकां । बरें जाणे ॥ ७ ॥
जाणोन पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व[7] ॥
ज्याचे त्यापरी गौरव[8] । राखों जाणे ॥ ८ ॥

## दशक १२ समास २ प्रत्ययनिरूपण

एक सुखी एक दुःखी । प्रत्यक्ष वर्तते लोकीं ॥
कष्टी होऊनियां शेखीं[9] । प्रारब्धावरी घालिती ॥१॥

---

१ विचाराचा २ एकदम ३ परीक्षा करूं ४ सर्व मनुष्यें ५ उद्योगी ६ आळशी ७ विशेष ८ महत्त्व ९ शेवटीं.

अचुक यत्न करवेना । म्हणोन केलें तें सजेना ॥
आपला अवगुण जाणेना । कांहीं केल्या ॥२॥
लोकांचें मनोगत[२] कळेना । लोकांसारिखें वर्तवेना ॥
मूर्खपणें लोकीं नाना । कलह उठती ॥ ३ ॥
मग ते कलह[३] वाढती । परस्परें कष्टी[४] होती ॥
प्रयत्न राहातां[५] अंतीं । श्रमाचि होये ॥ ४ ॥
ऐसी नव्हे वर्तणूक । परीक्षावे नाना लोक ॥
समजले पाहिजे नेमक[६] । ज्याचे त्यापरी ॥ ५ ॥
शब्द परीक्षा अंतर परीक्षा । कांहीं एक कळे दक्षा ॥
मनोगत नतद्रक्षा[७] । काय कळे ॥ ६ ॥
दुसऱ्यास शब्द[८] ठेवणें । आपला कैपक्ष[९] घेणें ॥
पाहों जातां लौकिक लक्षणें । बहुतेक ऐसी ॥ ७ ॥
लोकीं बरें म्हणाया कारणें । भल्यास लागतें सोसणें ।
न सोसितां भंडवाणें[१०] । सहजचि होये ॥ ८ ॥
बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहान थोरें ।
न्याय अन्याय परस्परें । सहजचि कळे ॥ ९ ॥
लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्षमा जो न करी ॥
तेणेंकरितां बराबरी । होत जाते ॥ १० ॥

---

१ सफल होत नाहीं २ मन ३ भांडण ४ दुःखी ५ थांबतां ६ नियमित स्वभाव ७ करंट्यास ८ दोष ९पक्ष-बाजू १० फजिती.

जंवरी चंदन झिजेना । तंव[2] तो सुगंध कळेना ॥
चंदन आणि वृक्ष नाना । सगट[3] होती । ११ ॥
जंव उत्तम न कळे । तों या जनास काय कळे ॥
उत्तम गुण देखतां निवळे । जगदंतर[4] ॥ १२ ॥
जगदंतर निवळत गेलें । जगदंतरीं सख्य झालें ॥
मग जाणावे वोळले[5] । विश्वजन ॥ १३ ॥

जनीं जनार्दन वोळला । तरी काय उणे तयाला ॥
राजी राखावें सकळाला । कठिण आहे ॥ १४ ॥
पेरिलें तें उगवतें । उसणें द्यावें घ्यावें लागतें ॥
वर्म काढितां भंगतें । परांतर[6] ॥ १५ ॥
लौकिकीं बरेंपण केलें । तेणें सौख्य वाढलें ॥
उत्तरासारिखें आलें । प्रत्युत्तर ॥ १६ ॥
हें अवघें आपणापासी । येथें बोल नाहीं जनासी ॥
शिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणा ॥ १७ ॥
खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला ॥
तरी मौनेंचि[7] स्थळ-त्याग[8] केला । पाहिजे साधकें ॥ १८ ॥

---

१ जोंपर्यंत २ तोंपर्यंत ३ सारखे ४ लोकांचें मन ५ प्रसन्न झाले ६ दुसऱ्याचें मन ७ न बोलतां ८ स्थलांतर, दुसरे जागीं जाणें.

लोक नाना परीक्षा जाणती । अंतरपरीक्षा[1] नेणती ॥
तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ १९ ॥
आपणास आहे मरण । म्हणोन राखावें बरेंपण ॥
कठिण आहे लक्षण । विवेकाचें ॥ २० ॥
थोर लहान समान[2] । आपले पारिखे सकळ जन ॥
चढतें वाढतें संनेधानें[3] । करितां बरें ॥ २१ ॥
बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास[4] येतें ॥
आतां पुढें मागावें तें । कोणास काय ॥ २२ ॥
हरिकथानिरूपण । बरेपणें राजकारण ॥
प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें[5] ॥ २३ ॥
विद्या उदंड शिकला । प्रसंगमान[6] चुकताचि गेला ॥
तरी मग तये विद्येला । कोण पुसे ॥ २४ ॥

## दशक १२ समास ४ विवेकवैराग्य

विवेकें अंतर सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला ॥
अंतर्बाह्य मोकळा झाला । निःसंग योगी ॥ १ ॥
जैसें मुखें ज्ञान बोले । तैसीच सर्वें[7] किंवा चाले ।
दीक्षा[8] देखोन चकित[9] झाले । शुचिष्मंत[10] ॥ २ ॥

१ अंतःकरणाची परीक्षा २ बरोबरीचे ३ संधान ४ अनुभवास ५ निष्फळ ६ वेळेस योग्य तसें वागणें ७ लागलीच ८ नित्यनेम ९ आश्चर्ययुक्त १० सदाचरणी लोक.

आस्था नाहीं त्रैलोक्याची । स्थिती बाणली वैराग्याची ॥
यत्न-विवेक-धारणेची । सीमा नाहीं ॥ ३ ॥
संगीत रसाळ[2] कीर्तन । ताळबद्ध तानमान ॥
प्रेमळ आवडीचें भजन । अंतरापासुनी ॥ ४ ॥
तत्काळचि सन्मार्ग लागे । ऐसा अंतरीं विवेक जागे ॥
वक्तृत्व करितां न भंगे । साहित्य प्रत्ययाचें ॥ ५ ॥
सन्मार्गें जगास मिळाला । म्हणजे जगदीश वोळला[3] ॥
प्रसंग पाहिजे कळला । कोणीएक ॥ ६ ॥
प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ॥
स्नानसंध्या भगवद्भजन पुण्य-मार्ग ॥ ७ ॥
विवक वैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हें कोंडापिसें[4] ॥
शद्बज्ञान एळिलेसें[5] । आपणचि वाटे ॥ ८ ॥
म्हणोन विवेक आणि वैराग्य । तोंचि जाणिजे महद्भाग्य ॥
रामदास म्हणे योग्य । साधु जाणति ॥ ९ ॥

## दशक १२ समास ९ यत्नशिकवण

लहान थोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं ॥
करंट्या सावध पाहीं । सदैव[6] होसी ॥ १ ॥

१ गरज २ प्रेमळ ३ प्रसन्न झाला ४ एककल्लीपणाचें वेंड. ५ शिळे, पांचट ६ भाग्यवान.

अंतरीं नाहीं सावधानता । यत्न ठाकेना[1] पुरता ॥
सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैचीं ॥ २ ॥
म्हणोन आळस सोडावा । यत्न साक्षेपें[2] जोडावा ॥
दुश्चित[3]पणाचा मोडावा ॥ थारा[4] बळें ॥ ३ ॥
प्रातःकाळीं उठत जावें । प्रातः[5]स्मरामि करावें ॥
नित्य नेमें स्मरावें । पाठांतर ॥ ४ ॥
मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट ॥
बा[6]ष्कपणाची वटवट । करूंच नये ॥ ५ ॥
दिशेकडे[7] दुरी जावें । शुचि[8]ष्मंत होऊन यावें ॥
येता कांहींतरी आणावें । रितें[9], खोटें[10] ॥ ६ ॥
धूतवस्त्रें घालावीं पिळून । करावें चरणक्षाळण ॥
देवदर्शन देवार्चन । यथासांग ॥ ७ ॥
कांहीं फळाहार घ्यावा । पुढें व्यवसाय करावा ॥
लोक आपला पै[11]रावा । म्हणत जावें ॥ ८ ॥
सुंदर अक्षर ल्याहावें ॥ स्पष्ट नेमस्त वाचावें ॥
विवें[12]विवरों जाणावें । अर्थांतर ॥ ९ ॥

---

१ होईना–करीना २ उद्योगानें झटून ३ गैरसावधपणाचा ४ जागा ५ प्रातःस्मरण ६ चावटपणाची ७ शौचविधीला ८ स्वच्छ ९ रिकामें १० वाईट ११ परक्याला आपला म्हणावें १२ चांगलें मनन करून.

नेमस्त नेटकें पुसावें । विशद करून सांगावें ॥
प्रत्ययेंविण बोलावें । तेंचि पाप ॥ १० ॥
सावधानता असावी । नीति मर्यादा राखावी ॥
जनास मानें ऐशी करावी । क्रियासिद्धी ॥ ११ ॥
आलियाचें समाधान । हरिकथा निरूपण ॥
सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ १२ ॥
बहुतांचें समाधान राखावें। बहुतास मानेल तें बोलावें ॥
विरंगै पडो नेदावे । कथेमध्यें ॥ १३ ॥
लोकांस उदंड वाजी आणूं नये । लोकांचें उकलावें हृदय
तरी मग स्वभावें होय । नामघोष ॥ १४ ॥
जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ॥
मग महंतलीळा स्वभावें । अंगीं बाणे ॥ १५ ॥
उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण ॥
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाडे न्यावी ॥ १६ ॥
सांग महंती संगीत गाणें । तेथें वैभवास काय उणें ॥
नभोमाजी तारांगणें । तैसे लोक ॥ १७ ॥

---

१ योग्य रीतीनें व नीटपणानें २ स्पष्ट ३ कार्य तडीस नेणें ४ बेरंग ५ जिकीर ६ महंताची कृति ७ लोकांना उदास वृत्ति आवडते ८ पलिकडे ९ महंतांचीं सर्व लक्षणें ( अंगें ) १० आकाशामध्यें ११ असंख्यतारा.

अकलेबंद[1] नाहीं जेथें । अवघेंचि विस्कळीत[2] तेथें ॥
एके अकलेविण तें । काय आहे ॥ १८ ॥
घालून अकलेचा पवाड[3] । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ॥
तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटेपण ॥ १९ ॥

## दशक १२ समास १० उत्तमपुरुषलक्षण

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ॥
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें ॥
तरतेनें[4] बुडों न द्यावें । बुडतयासी ॥ २ ॥
स्नानसंध्या देवार्चन । एकाग्र करावें जपध्यान ॥
हरिकथा निरूपण । केलें पाहिजे ॥ ३ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ॥
उणें पडों नेदावें । कोणीएकाचें ॥ ४ ॥
आडलें जाकसलें[5] जाणावें । यथानुशक्ति कामास यावें ॥
मृदु वचनें बोलत जावें । कोणाएकासी ॥ ५ ॥
दुसऱ्यांच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ॥
प्राणिमात्रांस[6] मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ६ ॥

---

१ चातुर्य २ अस्ताव्यस्त ३ विस्तार, तणावा ४ पोहणाऱ्यानें ५ गांजलें ६ सर्व लोकांना.

बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ॥
आपल्यापरीस[1] व्हावें । पारखें जन ॥ ७ ॥
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें ॥
लोकांस परीक्षीत जावें । नाना प्रकारें ॥ ८ ॥
नेमकेचि[2] बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें ॥
कदापि रागास न यावें । क्षमारूपें ॥ ९ ॥
आलस्य[3] अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा ॥
शब्दमत्सर न करावा । कोणीएकाचा ॥ १० ॥
नेमकेपणें[4] वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला ॥
सर्व आर्जवी तयाला । काय उणें ॥ ११ ॥
ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष ॥
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होय ॥ १२ ॥
उदंड धिःकारून बोलती । तरी चळों[5] नेदावी शांति ॥
दुर्जनासीं मिळोन जाती । धन्य तेचि साधु ॥ १३ ॥
परांतरास[6] न लागावा ढका[7] । कदापि पडों नेदावा चुका[8] ॥
क्षमाशील तयाच्या तुका । हानि नाहीं ॥ १४ ॥

---

१ स्वजनापेक्षां परजन अधिक मानावें २ नियमित ३ आळस ४ नियमितपणानें ५ ढळों न द्यावी ६ दुसऱ्याच्या मनास ७ दुःख ८ चूक.

आपलें अथवा पैरांचें । काम अवघेच करावें ॥
प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ १५ ॥
कठिण शद्ब वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ॥
तरी मग वाईट बोलावें तें । कायनिमित्त ॥ १६ ॥
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ॥
आपणांस घात करी । कोणी-एके प्रसंगीं ॥ १७ ॥
पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ॥
तरी मग कर्कश बोलावें तें । कायनिमित्त ॥ १८ ॥
आपल्या पुरुषार्थ-वैभवें । बहुतांस सुखी करावें ॥
परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ १९ ॥
क्रियेविण शद्बज्ञान । तेंचि श्वानाचें वमन ॥
भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ॥ २० ॥
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ॥
तया महापुरुषा कारणें । धुंडित येती ॥ २१ ॥
ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ॥
भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥ २२ ॥

---

१ परावें-दत्तात्रय-पाठ २ चांगलें ३ वाणी ४ पराक्रमाच्या मोठेपणानें ५ दुःखी ६ कुत्र्याचें ७ ओक ८ हुडकत ९ महात्मा.

आपण अवचितें[1] मरोनि जावें । मग भजन कोणें करावें ॥
या कारणें भजनास लावावें । बहुत लोक ॥ २३ ॥
आमची प्रतिज्ञा ऐशी । कांहीं न मागावें शिष्यासीं ॥
आपणा मागें जगदीशासी । भजत जावें ॥ २४ ॥
या कारणें समुदाव । झाला पाहिजे महोत्सव ॥
हातोपातीं[2] देवाधिदेव । बोळेसा[3] करावा ॥ २५ ॥
आतां समुदायाकारणें । पाहिजेत दोनी लक्षणें ॥
श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ॥ २६ ॥
जेणें बहुतास घडे भक्ती । ते हे रोकड[4] प्रबोधशक्ति ॥
बहुतांचें मनोगतें[5] हातीं । घेतलें पाहिजे ॥ २७ ॥
मागें बोलिले उत्तम गुण । तयास मानिती प्रमाण ॥
प्रबोधशक्तीचें लक्षण । पुढें चालें[6] ॥ २८ ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ॥
तयाचीं वचनें प्रमाण । मानिती जनीं ॥ २९ ॥
जें जें जनास मानेना । तें तें जनही मानीना ।
आपण एकला जन नाना । सृष्टीमध्यें ॥ ३० ॥
म्हणोन सांगातीं असावें । मानत मानत शिकवावें ॥
हळु हळु शेवटा न्यावें । विवेकानें ॥ ३१ ॥

१ एकदम २ लवकर ३ प्रसन्न होईलसा ४ रोख–प्रत्यक्ष ५ मन ६ पुढें सांगितलें आहे.

## दशक १२ समास १० शिकवणनिरूपण

साकर माती पृथ्वी होय । परी ते माती खातां नये ।
गरळ[1] आप[2] नव्हे काय । परी तें खोटें ॥ १ ॥
पुण्यात्मा आणि पापात्मा । दोहींकडे अंतरात्मा ॥
साधु भोंदु सीमा[3] । सांडूंच नये ॥ २ ॥
अंतर[4] एक तों खरें । परी सांगातें घेऊं नयेती महारें ॥
पंडित आणि चाटे[5] पोरें । एक कैसीं ॥ ३ ॥
मनुष्य आणि गर्धडे[6] । राजहंस आणि कोंबडे ॥
राजे आणि माकडें । एक कैसीं ॥ ४ ॥
भागीरथीचें जळ आप । मोरी-सवर्दणीचें[7] तेंहि आप ॥
कुश्चिळ उदेक[8] अल्प । सेववेना[9] ॥ ५ ॥
या कारणें आचारशुद्ध । त्या उपरी विचारशुद्ध ॥
वीतरागी[10] आणि सुबुद्ध[11] । ऐसा पाहिजे ॥ ६ ॥
एका उदकें सकळ झालें । परी पाहोन पाहिजे सेविलें ॥
सगट अवघेंच घेतलें । तरी तें मूर्खपण ॥ ७ ॥
जीवनाचेंच झालें अन्न । अन्नाचें झालें वमन[12] ॥
परी वमनाचें भोजन । करितां नये ॥ ८ ॥

---

१ विष २ पाणी ३ मर्यादा-भेद ४ अंतःकरण ५ चावट ६ गाढव ७ डबक्याचें, परांट-भांड्याचें ८ थोडें ९ घेववेना १० वैराग्यशील -संसारावरील प्रीति ज्याची गेली आहे अशा ११ चतुर १२ ओक.

तैसें निंद्य[1] सोडून द्यावें । वंद्य[2] ते हृदयीं धरावें ॥
सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ[3] ॥ ९ ॥
सांडा अवघे करंटपण । धरावें उत्तम लक्षण ॥
हरिकथा पुराणश्रवण । नीतिन्याय ॥ १० ॥
वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक ॥
हळु हळु पुण्यश्लोक[4] । करीत जावे ॥ ११ ॥
मुलाच्या चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ॥
तैसें जनासी शिकवावें । हळु हळु ॥ १२ ॥
मुख्य मनोगत राखणें । हेंचि चातुर्याचीं लक्षणें ॥
चतुर तो चतुरंग[5] जाणे । इतर तीं वेडीं ॥ १३ ॥
वेड्यास वेडे म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये ॥
तरीच घडे दिग्विजय । निस्पृहासी ॥ १४ ॥
उदंडस्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें यथासांग ॥
प्राणिमात्रांचा[6] अंतरंग[7] । होऊनि जावे ॥ १५ ॥
मनोगत राखों[8] न जातां । परस्परें होय अवस्था[9] ॥
मनोगत तोडितां व्यवस्था[10] । बरी नाहीं ॥ १६ ॥

---

१ लोक निंदा करितात तें, वाईट २ लोक स्तुति करतात तें, चांगलें ३ सर्व पृथ्वी ४ पुण्यवंत ५ सर्व अंगें-साम, दाम भेद व दंड असे चार प्रकार ६ सर्व प्राण्यांचा ७ अंतरात्मा ८ राखोन—कल्याण पाठ. ९ प्रेम १० परिणाम.

या कारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ॥
मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ॥ १७ ॥

## दशक १४ समास १ निस्पृहलक्षण

ऐका निस्पृहाची शिकवण । युक्ति बुद्धि शहाणपण ॥
जेणें राहे समाधान । निरंतर ॥ १ ॥
सोपा मंत्र पैरी[1] नेमस्त । साधे औषध गुणवंत ॥
साधें बोलणें सप्रचीत । तैसें माझें ॥ २ ॥
तत्काळाचे अवगुण जाती । उत्तम गुणाची होय प्राप्ती ॥
शब्दे–औषध[2] तीव्र, श्रोतीं । सांक्षेपें[3] सेवावें ॥ ३ ॥
निस्पृहता धरूं नये । धरिली तरी सोडूं नये ॥
सोडली तरी हिंडों नये । ओळखीमध्यें ॥ ४ ॥
कांतां[4] दृष्टी राखों नये । मनास गोडी चाखवूं नये ॥
धारिष्ट चळतां दाखवूं नये । मुख आपुलें ॥ ५ ॥
एके स्थळीं राहों नये । कानकोंडे[5] साहों नये ॥
द्रव्य दारा पाहों नये । आळंकेपणें[6] ॥ ६ ॥
आचारभ्रष्ट होऊं नये । दिल्या द्रव्य घेऊं नये ॥
उणा शब्द येऊं नये । आपणावरी ॥ ७ ॥

---

१ परंतु २ शद्ब–उपदेश–रूपी औषध ३ प्रयत्नानें–आळस करितां ४ स्त्री ५ आकुंचित वृत्ती ६ अभिलाष–वुद्धीनें.

भिक्षेविषयीं लाजों नये । बहुत भिक्षा घेऊं नये ॥
पुसतांही[1] देऊं नये । ओळखी आपली ॥ ८ ॥
धड मळिण नेसों नये । गोड अन्न खाऊं नये ॥
दुराग्रह करूं नये । प्रसंगें[2] वर्तावें ॥ ९ ॥
भोगीं मन असों नये । देह-दुःखें त्रासों नये ॥
पुढें आशा धरूं नये । जीवित्वाची[3] ॥ १० ॥
पोटीं[4] चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये ॥
समयीं धीर सांडूं नये । कांहीं केल्या ॥ ११ ॥
अपमानितां शिणों[5] नये । निखंदितां[6] कष्टों नये ॥
धिःकारितां झुरों नये । कांहीं केल्या ॥ १२ ॥
हांसवितां हांसों नये । बोलवितां बोलों नये ॥
चालवितां चालों नये ॥ क्षणक्षणा ॥ १३ ॥
एक वेष धरूं नये । एक साज[7] करूं नये ॥
एकदेशी होऊं नये । भ्रमण करावें ॥ १४ ॥
सलगी[8] पडों देऊं नये । प्रतिग्रह[9] घेऊं नये ॥
सभेमध्यें बैसों नये । सर्वकाळ ॥ १५ ॥

---

१ विचारल्यावर २ प्रसंगाप्रमाणें वागावें ३ जगण्याची ४ मनांत ५ वाईट वाटूं देऊं नये ६ निंदा केल्यास ७ वेष ८ विशेष स्नेह ९ दान.

नेम अंगीं लावूं नये । भरंवसा कोणास देऊं नये ॥
अंगिकार करूं नये । नेमस्तपणाचा ॥ १६ ॥
नित्य-नेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये ॥
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥ १७ ॥
स्वतंत्रता मोडूं नये । निरपेक्षा[1] तोडूं नये ॥
परोपक्षा[2] होऊं नये । क्षणक्षणा ॥ १८ ॥
अतिवाद करूं नये । अनीति पोटीं धरूं नये ॥
रागें कधीं भरों नये । भलतीकडे ॥ १९ ॥
न मानी त्यास सांगों नये । कंटाळवाणें बोलों नये ।
बहूसाल असों नये । एके स्थळीं ॥ २० ॥
कांहीं उपाधी[3] करूं नये । केली तरी धरूं[4] नये ॥
धरिली तरी सांपडूं नये । उपाधीमध्यें ॥ २१ ॥
थोरपणें असों नये । महत्व धरून बसों नये ॥
कांहीं मान इच्छूं नये । कोठेंतरी ॥ २२ ॥
अधिकारेवीण सांगों नये । दाटून[5] उपदेश देऊं नये ॥
कानकोंडा[6] करूं नये । परमार्थ कदा ॥ २३ ॥
कठिण[7] शद्ब बोलों नये । कठिण आज्ञा करूं नये ॥
कठिणता धरूं नये । कांहीं केल्या ॥ २४ ॥

---

१ कोणाची अपेक्षा ( मदतीची इच्छा ) न धरणें २ दुसऱ्याची अपेक्षा ३ व्याप ४ उपाधींत आसक्ति धरूं नये ५ बळेंच ६ कोंपऱ्यांत-कोणास न कळतां ७ कठोर.

आपण आसक्त होऊं नये । केल्यावीण सांगों नये ॥
बहूसाळे[1] मागों नये । शिष्यवर्गासी ॥ २५ ॥
उद्धट शद्ब बोलों नये । इंद्रिय-स्मरण करूं नये ॥
शाक्तमार्ग[2] भरों नये । मुक्तपणें[3] भरी ॥ २६ ॥
सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडु नये ॥
कदा सुख मानू नये । निसुंगपणाचें[4] ॥ २७ ॥
विकल्प[5] पोटीं धरूं नये । स्वार्थ--आज्ञा करूं नये ॥[6]
केली तरी टाकूं नये । आपणास पुढें ॥ २८ ॥
नेणपणें[7] सोडूं नये । महंतपण धरूं नये ॥
द्रव्यासाठीं हिंडों नये । कीर्तन करीत ॥ २९ ॥
संशयात्मक बोलूं नये । बहुत निश्चय करूं नये ॥
निर्वाहेवीण[8] धरूं नये । ग्रंथ हातीं ॥ ३० ॥
स्वार्थबुद्धी[9] जडों नये । कारभारी पडों नये ॥
कार्यकर्ते होऊं नये राजद्वारीं ॥ ३१ ॥
कोणास भरंवसा देऊं नये । जड भिक्षा मागूं नये ॥
भिक्षेसाठीं सांडूं नये । परमार्थ आपुला ॥ ३२ ॥

---

१ पुष्कळ २ स्वच्छंदपणानें वागण्याचा मार्ग ३ मुक्त आहे अशा डौलानें ४ आळसाचे ५ वाईट कल्पना ६ स्वतःच्या लोभाची अशी ७ अज्ञानपण ८ स्पष्ट करून सांगण्याची योग्यता असल्याशिवाय. ९ कठिण वाटेल अशी.

सोइरिकींत पडों नये । मध्यावेर्ती[1] पडों नये ॥
प्रपंचाची जडों नये । उपाधी अंगीं ॥ ३३ ॥
प्रपंचहर्स्ती[2] जाऊं नये । बाष्कळ अन्न खाऊं नये ॥
पाहुण्यासारिसे घेऊं नये । आमंत्रणें कदा ॥ ३४ ॥
श्राद्ध पक्ष सटी साभासें[3] । शांती फळशोभन बारसें ॥
भोग[4] राहण बहुवसें । नवस व्रतें उद्यापनें ॥ ३५ ॥
तेथें निस्पृहें जाऊं नये । त्यांचें अन्न घेऊं नये ॥
केविलवाणें[5] करूं नये । आपणासी ॥ ३६ ॥
लग्न मुहूर्ती जाऊं नये । पोटासाठीं मागूं नये ॥
मोलें[6] कीर्तन करूं नये । कोठेंतरी ॥ ३७ ॥
आपली भिक्षा सोडूं नये । वारें[7] अन्न खाऊं नये ॥
निस्पृहासी घडों नये । मोलयात्रा ॥ ३८ ॥
मोलें सुकृत[8] करूं नये । मोलपुजारी होऊं नये ॥
दिला तरी घेऊं नये । इनाम निस्पृहें ॥ ३९ ॥
कोठें मठ करूं नये । केला तरी तो धरूं नये ॥
मठपती होऊन बसों नये । निस्पृह-पुरुषें ॥ ४० ॥
निस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथेंच न सांपडावें ॥
परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी ॥ ४१ ॥

---

१ मध्यस्त २ प्रपंचाच्या हातीं, प्रपंच-प्रस्ती-कल्याण पाठ ३ सहा महिन्याचीं श्राद्धें ४ मेजवान्या ५ दैन्यवाणें ६ पैसे घेऊन ७ वार-दिवस-लावून ८ पुण्य.

प्रयत्नेविण राहों नये । आळस दृष्टीसी आणूं नये ॥
देह असतां पाहों नये । अंत[1] उपासनेचा ॥ ४२ ॥
उपाधीमध्यें पडों नये । उपाधी अंगीं जडों नये ॥
भजनमार्ग मोडूं नये । निसंगपणें ॥ ४३ ॥
बहु उपाधी करूं नये । उपाधीविण कामा नये ॥
सगुणभक्ति सोडूं नये । विभक्ति[2] खोटी ॥ ४४ ॥
बहूसाल धावों नये । बहूसाल राहों नये ॥
बहूत कष्ट करूं नये । असुदें[3] खोटें ॥ ४५ ॥
बहुतसाल बोलों नये । अबोलणें कामा नये ॥
बहुत अन्न खाऊं नये । उपवास खोटा ॥ ४६ ॥
बहूसाल निजों नये । बहूत निद्रा मोडूं नये ॥
बहू नेम धरूं नये बाष्कळ[5] खोटें ॥
बहू जनीं असों नये । बहू अरण्य सेवूं नये ॥
बहू देह पाळूं नये । आत्महत्या खोटी ॥ ४८ ॥
बहू संग धरूं नये । संतसंग सांडूं नये ॥
कर्मठपणा कामा नये । अनाचार[6] खोटा ॥ ४९ ॥
बहु विषय भोगूं नये । विषयत्याग करितां नये ॥
देहलोभ धरूं नये । बहु त्रास खोटा ॥ ५० ॥

---

१ शेवट २ वेगळेपणानें राहणें ३ आयदीपणा ४ मुळींच न बोलणें ५ मर्यादा-रहित ६ वाईट आचार.

ज्ञातेपण धरूं नये । ज्ञानेंविण कामा नये ॥
अतर्क्य[2] वस्तु तर्कों नये ।तर्केंविण[3] खोटें ॥५१॥
जगीं भेद कामा नये । वर्णसंकर करूं नये ।।
आपला धर्म उडवूं नये । अभिमान खोटा ॥ ५२ ॥
आशाबद्धक[5] बोलों नये । विवेकेंविण चालों नये ॥
समाधान हालों नये कांहीं केल्या ॥ ५३ ॥
निस्पृहें वक्तृत्व सांडूं नये । आशंका घेतां भांडों नये ॥
श्रोतयांचा मानूं नये । वीट कदा ॥ ५४ ॥
हे शिकवण धरितां चित्तीं । सकळ सुखें वोळंगती[6] ॥
अंगीं बाणे महंती । अकस्मात ॥ ५५ ॥

## दशक १४ समास ६ चातुर्यलक्षण

रूप लावण्य अभ्यासितां नये ।सहज गुणास न चले उपाय
कांहीं तरी धरावी सोय । आगंतुक[8] गुणाची ॥ १ ॥
अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती ॥
कुविद्या सांडून शिकती । शहाणे विद्या ॥ २ ॥
मूर्खपण सांडितां जातें । शहाणपण शिकतां येतें ॥
कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ३ ॥

---

१ ज्ञानाचा अहंकार २ ब्रह्म ३ तर्क न चालविणें वाईट ४ सब गोलंकार ५ आशा धरून ६ प्राप्त होतात ७ नैसर्गिक, उपजत ८ नवीन.

मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी ॥
चातुर्येंविण उंच पदवी । कदापी नाहीं ॥ ४ ॥
आपण दुसऱ्यास करावें । तें उसिणें सेवेंचि घ्यावें ॥
जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ ५ ॥
न्यायें वर्तेल तो शाहणा । अन्यायी तो दैन्यवाणा ॥
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ ६ ॥
जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें ॥
येरें तें व्यर्थचि गेलें । जगनिंद्य ॥ ७ ॥
लोक आपणांसि वोळावे । किंवा अवघेचि कोंसळावे ॥
आपणांस समाधान फावे । ऐसें करावें ॥ ८ ॥
समाधानान समाधान वाढे । मैत्रिनें मैत्री जोडे ॥
मोडितां क्षणमात्र मोडे । बरेंपण ॥ ९ ॥
चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर ॥
दोहींमध्यें कोण थोर । बरें पहा ॥ १० ॥
तनें मनें झिजावें । तेणें भले ह्मणोन घ्यावें ॥
उगेचि कल्पितां शिणावें । लागेल पुढें ॥ ११ ॥
लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे ॥
लोक सहजचि वोढे । कामासाठीं ॥ १२

१ लागलीच २ दुसरें ३ प्रसन्न व्हावे ४ मिळावे ५ शोभा पावतें ६ शरीरानें.

म्हणोनि दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें॥
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ॥ १३ ॥
समजले आणि वर्तले[1] । तेचि भाग्य पुरुष झाले ॥
या वेगळे उरले ते । करंटे पुरुष ॥ १४ ॥
जितका व्याप[2] तितकें वैभव । वैभवासारिखा हावभाव ॥
समजले पाहिजे उपाय । प्रगटाचि आहे ॥ १५ ॥
आळसें कार्यभाग नाशतो । [3]साक्षेपें होत होत जातो ॥
दिसते गोष्टी कळेना तो । शाहणा कैसा ॥ १६ ॥
मैत्री करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्यु ॥
बोलिलें हें सत्य कीं असत्य । ओळखावें ॥ १७ ॥
आपण एकाएकीं एकला । सृष्टींत भांडत चालला ॥
बहुतांमध्यें एकल्याला । यश कैचें ॥ १८ ॥
बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें ॥
उत्तम गुणीं विवरावें । प्राणी-मात्रासी ॥ १९ ॥
शहाणे करावे जन । [4]पतित करावे पावन ॥
[5]सृष्टीमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥ २० ॥

**दशक १५ समास १ चातुर्यलक्षण**

जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ॥

---

१ वागले २ पसारा ३ उद्योगानें, प्रयत्नानें ४ पापी
५ जगामध्यें.

राहराहों शोध घ्यावा । परांतरा[1]चा ॥ १ ॥
दुसऱ्याचे जीवींचें[2] कळेना । परांतर जाणवेना ॥
वश होती लोक नाना । कोण्या प्रकारें ॥ २ ॥
श्रेष्ठ कार्य करी तो श्रेष्ठ । कृत्रिम[3] करी तो कनिष्ठ ॥
कर्मानुसार[4] प्राणी नष्ट । अथवा भले ॥ ३ ॥
जो [5]जगदंतरें मिळाला । तो जगदंतरचि झाला ॥
[6]अरत्रीं [7]परत्रीं तयाला । काय उणें ॥ ४ ॥
आचार विचाराविण । जें जें करणें तो शीण ॥
धूर्त आणि विचक्षण[8] । तेचि शोधावे ॥ ५ ॥
उदंड बाजारी[9] मिळाले । परी ते धूर्तेंचि [10]आंळिले ॥
धूर्तापाशीं कांहीं न चले । बाजाऱ्यांचें ॥ ६ ॥
या कारणें मुख्य मुख्य । तयासी करावें सौख्य ॥
येणें करितां असंख्य । बाजारी मिळती ॥ ७ ॥
धूर्तासि धूर्तचि आवडे । धूर्त धूर्तांच पवाडे[11] ॥
उगेचि हिंडती वेडे । कार्येविण ॥ ८ ॥
धूर्तासि धूर्तपण कळलें । तेणें मनास मन मिळालें ।

---

१ परांतर=दुसऱ्याचें अंतःकरण २ अंतःकरणाचें ३ चुकारपणा ४ कर्माप्रमाणें ५ जगाच्या अंतःकरणांत ६ या लोकीं ७ परलोकीं ८ शहाणे ९ बाजारबुणगे १० ताब्यांत ठेवलें ११ ओळखे.

परी हें गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्वें ॥ ९ ॥
समर्थाचें राखतां मन । तेथें येती उदंड जन ॥
जन आणि सज्जन । आर्जव करिती ॥ १० ॥
ओळखीनें ओळखी साधावी । बुद्धीनें बुद्धि बोधावी ॥
नीतिन्यायें वाट रोधावी । पाषांडाची ॥ ११ ॥
वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ॥
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ॥ १२ ॥
निस्पृह आणि नित्य नूतन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ॥
प्रगट जाणतां सज्जन । दुर्लभ जगीं ॥ १३ ॥
नाना जिनस पाठांतरें । निवती सकळांचीं अंतरें ॥
चंचळपणें तदनंतरें ॥ सकळाठायीं ॥ १४ ॥
एके ठायीं बैसोन राहिला । तरी मग व्यापचि बुडाला ॥
साधनपणें ज्याला त्याला । भेटी द्यावी ॥ १५ ॥
भेटभेटों उरी राखणें । हीं चातुर्याचीं लक्षणें ॥
मनुष्यमात्रें उत्तमगुणें । समाधान पावे ॥ १६ ॥

---

१ गुपचुप, गाजावजा न करितां २ श्रेष्ठाचें-पुढाऱ्याचें ३ चेतवावी ४ बावळटासारखा ५ युक्ती ६ सर्व ७ प्रेमभाव ८ नवीन ठिकाणीं हिंडणारा ९ अनुभवाचें १० स्पष्ट ११ अनेक ग्रंथाचें पाठांतर-वाचन (पठण) १२ प्रसन्न होती १३ अस्थिरपणानें-सदा फिरण्यानें १४ पसारा १५ इच्छा १६ सर्व मनुष्यें.

## दशक ५ समास १२ निस्पृहव्यापलक्षण

स्याहिमध्यें जो तीक्ष्ण[1] । रिकामा जाऊं नेदी क्षण ॥
धूर्त तार्किक विचक्षण । सकळां माने ॥ १ ॥
नाना जिनस[2] उदंड पाठ । वदों लागला घडघडाट ॥
अव्हाटचि[3] केली वाट । सामर्थ्यबळें ॥ २ ॥
प्रबोध शक्तीचीं अनंत द्वारें । जाणे सकळांचीं अंतरें ।
निरूपणें तदनंतरें । चटक लागे ॥ ३ ॥
मतें मतांतरें सगट । प्रत्यय बोलेन करी सपाट ॥
दंडक[5] सांडून नीट । वेधी जना ॥ ४ ॥
नेमकें भेदकें[6] वचनें । अखंड पाहे प्रसंग—मानें ॥
उदास वृत्तीच्या गुमानें[7] । उठोन जातो ॥ ५ ॥
प्रत्यय बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला ॥
नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ॥ ६ ॥
परी तो कोठें आढळेना । कोणे स्थळीं सांपडेना ॥
वेष पाहतां हीनदीना । सारिखा दिसे ॥ ७ ॥
उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ॥
तेथें यश--कीर्ति--प्रतापें । सीमा सांडिली ॥ ८ ॥

---

१ तीव्र बुद्धीचा २ ग्रंथ ३ आडवाट ४ निरुत्तर ५ अज्ञानाचा मार्ग ६ मर्मभेदक ७ डौलानें.

ठायीं ठायीं भजन लावी । आपण तेथून चुकावी ॥
मत्सर मतांची [1]गोंवी । लागोंच नेदी ॥ ९ ॥
[2]खनाळामध्यें जाऊन राहे । तेथें कोणीच न पाहे ॥
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ॥ १० ॥
अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहणें नेमक ॥
सृष्टीमध्यें सकळ लोक । [3]धुंडीत येती ॥ ११ ॥
तेथें कोणाचें चालेना । [4]अनुमात्र अनुमानेना ॥
[5]कट्टे घालून राजकारणा । लोक लावी ॥ १२ ॥
लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद झाले ॥
भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ १३ ॥
ठायीं ठायीं गुप्त [6]तांबे । मनुष्यमात्र तितकें [7]झोंबे ॥
चहुंकडे उदंड लांबे । परमार्थ बुद्धी ॥ १४ ॥
उपासनेचा गजर [8] । स्थळोस्थळीं थोर थोर ॥
प्रत्ययानें प्राणिमात्र [9] । सोडविले ॥ १५ ॥
ऐसे [10]केवाड उदंड जाणे । तेणें लोक होती शहाणे ॥
जेथें तेथें प्रत्यय बाणे । प्राणिमात्रासी ॥ १६ ॥

---

१ संबंध-गुंतागुंत २ दरीखोरींत ३ शोधीत ४ थोडें देखील अनुमानानें कळत नाहीं ५ सर्व लोक एकत्र करून ६ मंडळें ७ मागें लागतात ८ जयजयकार ९ सर्व लोक १० प्रकार.

ऐसी कीर्ति करून जावें । तरीच संसारांत यावें ॥
दास म्हणे स्वभावें । संकेतें[1] बोलिलें ॥ १७ ॥

## दशक १५ समास ६ चातुर्यविवरण

रेखा[2] तितकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येतें ॥
डोळे झांकणी करावी ते । काय--निमित्य ॥ १ ॥
बहुतांचे बोलीं लागले । ते प्राणी अनुमानीं बुडाले ॥
मुख्य निश्चय चुकले । प्रत्ययाचा ॥ २ ॥
उदंडांचे उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पहावें ॥
खरें खरें निवडावें । अंतर्यामीं[3] ॥ ३ ॥
कोणास न्हे[4] ह्मणों नये । समजावे अपायें[5] उपायें[6] ॥
प्रत्यय घ्यावा, बहुत काय । बोलोनियां ॥ ४ ॥
माणुस हेंकाड[7] आणि कच्चें । मान्य करावें तयाचें ॥
येणें प्रकारें बहुतांचें । अंतर राखावें ॥ ५ ॥
वेडे करावे शाहणे । तरीच जिणें श्लाघ्यवाणें[8] ॥
उगेच वादांगे[9] वाढविणें । हें मूर्खपण ॥ ६ ॥
मिळोन जाऊन मेळवावें । पडी घेऊन उलथावें ॥
कांहींच कळों नेदावें[10] । विवेकबळें ॥ ७ ॥

---

१ थोडक्यांत २ पाटीवरची रेघ ३ अंतःकरणांत ४ नाहीं ५ अहित ६ हित, फायदा ७ हट्टी ८ स्तुतीस पात्र—चांगलें ९ वादाच्या बाजू १० कळूं देऊं नये.

दुसऱ्याचे चालणीं चालावें । दुसऱ्याचे बोलणीं बोलावें ॥
दुसऱ्याचे मनोगतें[1] जावें । मिळोनिया ॥ ८ ॥
जो दुसऱ्याच्या हितावरी । तो विपट[2] कांहींच न करी ॥
मानत मानत विवरी । अंतर तयाचें ॥ ९ ॥
आधीं अंतर[3] हातीं घ्यावें । मग हळु हळु उकलावें[4] ॥
नाना उपायें न्यावें । परलोकासी[5] ॥ १० ॥
उगीच करिती गडबड । परी करून दाखविणें अवघड ॥
परस्थळ[6] साधणें जड । कठिण आहे ॥ ११ ॥
धक्के चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे ॥
परस्तावोन परावे । आपले होती ॥ १२ ॥
प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण[7] कांहींच न घ्यावें ॥
लीनता[8] धरून जावें । जेथें तेथें ॥ १३ ॥
कुग्रामें[9] अथवा नगरें[10] । पाहावीं घरांचीं घरें ॥
भिक्षामिषें[11] लहान थोरें । परीक्षून सोडावीं ॥ १४ ॥
बहुतां कांहीं तरी सांपडे । विचक्षण लोकीं मैत्री घडे ॥
उगेंच बैसतां कांहीं न घडे । फिरणें विवरणें ॥ १५ ॥

---

१ मनाप्रमाणें २ विरोध ३ मन ४ आपले विचार हळुहळू त्यांच्या मनांत शिरवावे ५ परलोकाचा मार्ग दाखवावा ६ मोक्ष अगर शत्रूचा किल्ला ७ ज्ञातेपणाचा अभिमान ८ नम्रता ९ खेडीं १० शहरें ११ भिक्षेच्या मिषानें.

सावधपणें सर्व जाणावें । वर्तमान आधींच घ्यावें ॥
जाऊं नये तिकडे जावें । विवेकेंसहित ॥ १६ ॥
नाना जिनस[1] पाठांतरें । निवती सकळांचीं अंतरें ॥
लिहोन देतां परोपकारें । सीमा सांडावी ॥ १७ ॥
जैसें जयास पाहिजे । तें तें तत्काळचि दीजे ॥
तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळां मान्य ॥ १८ ॥
भूमंडळीं सकळांसी[2] मान्य । तो म्हणों नये सामान्य ॥
कित्येक लोक अनन्य[3] । तया पुरुषासी ॥ १९ ॥
ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजय करणें ॥
मग तयास काय उणें । जेथें तेथें ॥ २० ॥

## दशक १८ समास २ सर्वज्ञसंगनिरूपण.

जाणत्याची संगति धरावी । जाणत्याची सेवा करावी ॥
जाणत्याची सद्बुद्धी घ्यावी । हळु हळु ॥ १ ॥
जाणता बोलेल तैसें बोलावें । जाणता सांगेल तैसें चालावें ॥
जाणत्याचें ध्यान ध्यावें । नाना प्रकारीं ॥ २ ॥
जाणत्याच्या कथा शिकाव्या । जाणत्याच्या युक्ति समजाव्या
जाणत्याच्या युक्ति विवराव्या । सकळ कांहीं ॥ ३ ॥

---

१ ग्रंथ २ द्यावें ३ एकनिष्ठ.

जाणत्याचे पेंच जाणावे । जाणत्याचे पीळ उकलावे ॥
जाणता राखेल तैसें राखावे । लोक राजी ॥ ४ ॥
जाणत्याचें धूर्तपण । जाणत्याचें राजकारण ॥
जाणत्याचें निरूपण । ऐकत जावें ॥ ५ ॥
जाणत्याचा भक्तिमार्ग । जाणत्याचा वैराग्ययोग ॥
जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ॥ ६ ॥
जाणत्याचें अलिप्तपण । जाणत्याचें विदेहलक्षण ॥
जाणत्याचें ब्रह्मविवरण । समजोन घ्यावें ॥ ७ ॥
परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद ॥
तेणे करितां आनंद । उदंड होतो ॥ ८ ॥

## दशक १८ समास ३ निस्पृहशिकवण

दुर्लभ शरीरीं दुर्लभ आयुष्य । याचा करूं नये नाश ॥
दास म्हणे सावकाश । विवेक पाहावा ॥ १ ॥
न पाहतां उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक ॥
अविवेकें प्राणी रंक[1] । ऐसा दिसे ॥ २ ॥
हें आपलें आपण केलें । आळसें उदासें[2] नागविलें ॥
वाईट संगतीनें बुडविलें । देखत देखतां ॥ ३ ॥
लिहिणें नाहीं वाचणें नाहीं । पुसणें[3] नाहीं सांगणें नाहीं ॥
नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं । बाष्कळपणें[4] ॥ ४ ॥

---

१ दैन्यवाणा २ विरक्त ३ विचारणें ४ स्वच्छंदपणानें.

आपणास कांहींच येना । आणि शिकविलेंही मानेना ॥
आपण वेडा आणि सज्जना । बोले[1] ठेवी ॥ ५ ॥
अंतरीं[2] एक बाहेर एक । ऐसा जयाचा विवेक ॥
परलोकाचें सार्थक । कैसें घडे ॥ ६ ॥
आपला संसार नासला । मनामध्यें पस्तावला ॥
तरी मग अभ्यास केला । पाहिजे विवेकाचा ॥ ७ ॥
एकाग्र करूनियां मन । बळेंचि धरावें साधन ॥
यत्नीं आळसाचें दर्शन । होऊंच नये ॥ ८ ॥
अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे ॥
प्रबंध पाठ करीत जावे । जाड[3] अर्थ ॥ ९ ॥
कोणे प्रसंगीं काय म्हणावें । ऐसें समजोन जाणावें ॥
उगेंच वाउगें[4] शिणावें । कासयासी ॥ १० ॥
दुसऱ्याचें अंतर[5] जाणावें । आदर देखोन ह्मणावें ॥
जें आठवेल तें गावें । हें मूर्खपण ॥ ११ ॥
ज्याची जैसी उपासना । तेंचि गावें चुकाविना[6] ॥
रागज्ञाना ताळज्ञाना । अभ्यासावें ॥ १२ ॥
साहित्य संगीत प्रसंगमानें । करावीं कथेचीं घमशानें ॥
अर्थांतर श्रवण मननें । काढीत जावें ॥ १३ ॥

---

१ दोष २ मनांत ३ गहन ४ व्यर्थ ५ मन ६ चुकूं नये
७ काळवेळ ८ लयलूट ९ अर्थ-रहस्य.

पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें ॥
सांगितले गोष्टीचें असावें । स्मरण अंतरीं ॥ १४ ॥
अखंड एकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा ॥
प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥ १५ ॥

## दशक १८ समास ६ उत्तमपुरुषनिरूपण

नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर श्रृंगारणें ॥
विवेकें विचारें राजकारणें । अंतर श्रृंगारिजे ॥ १ ॥
शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज ॥
अंतरीं नसतां चातुर्य-बीज । कदापि शोभा न पावे ॥ २ ॥
तऱ्हे शीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा ॥
राजकारण संवादा । मिळेचि नेणे ॥ ३ ॥
ऐसे लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ॥
पापी अपस्मार जनीं । राक्षस जाणावे ॥ ४ ॥
समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना ।
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ ५ ॥
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें ॥
हट-निग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ॥ ६ ॥

---

१ सर्व ग्रंथ २ मन ३ सजवून तयार ४ व्यत्यय, अंडथळा ५ सोडावें.

बहुताचि करितां हट । तेथें येऊन पडले तट[1] ॥
कोणी एकाचा[2] शेवट । झाला पाहिजे ॥ ७ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी ॥
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ ८ ॥
म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड ॥
या कारणें अखंड । सावधान असावें ॥ ९ ॥
सकळ कर्ता तो ईश्वर । तेणें केला अंगीकारु ॥
तया पुरुषाचा विचारु । विरळा जाणे ॥ १० ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंग-प्रकार ॥
परीक्षणें परांतर[3] । देणें ईश्वराचें ॥ ११ ॥
महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ॥
अद्भुताचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १२ ॥
यश कीर्ती प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा ॥
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १३ ॥
देव ब्राह्मण आचार विचार । कित्येक जनासी आधार ॥
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ १४ ॥
इहलोक परलोक पहाणें । अखंड सावधपणें राहाणें ॥
बहुत जनाचें सोहणें[4] । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥

---

१ पक्ष २ क्वचित् कोणी मनुष्य ३ दुसऱ्याचें मन ४ सोसणें.

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ॥
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥
उत्तम गुणाचा ग्राहक । तर्क तीक्ष्ण विवेक ॥
धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ १७ ॥
सकळ गुणामध्यें सार । तजविजा विवेक विचार ॥
जेणें पाविजे पैलपार[1] । अरत्रपरत्रींचा[2] ॥ १८ ॥

**दशक १८ समास ७ जनस्वभावनिरूपण**

जनाचा लालची[3] स्वभाव । आरंभींच म्हणती देव ॥
म्हणिजे मजला कांहीं देवं[4] । ऐसी वासना ॥ १ ॥
कांहींच भक्ति केली नसतां । आणि इच्छिती प्रसन्नता ॥
जैसें कांहींच सेवा न करितां । स्वामीस मागती ॥ २ ॥
कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ॥
केल्याविण होत नाहीं । साध्य[5] जनीं ॥ ३ ॥
आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ॥
कष्टाकडे चुकवितें । हीन जन ॥ ४ ॥
आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ॥
आधीं आळसें सुखावती । त्यांस पुढें दुःख ॥ ५ ॥

---

१ पलीकडचे तीर २ या लोकींचा व परलोकींचा ३ लोभी ४ द्यावें ५ प्राप्त.

इहलोक अथवा परलोक। दोहिंकडे सारखाचि विवेक॥
दीर्घ सूचनेचें कौतुक। कळलें पाहिजे ॥ ६ ॥
मिळविती तितकें भक्षिती। ते कठिण काळीं मरोन जाती॥
दीर्घ सूचनेनें वर्तती। तेचि भले ॥ ७ ॥
एकदां मेल्यानें सुटेना। पुन्हा जन्मोजन्मीं यातना॥
आपणास मारी वांचविना। तो आत्महत्यारा ॥८ ॥
देवाचें कर्तृत्व आणि देव। कळला पाहिजे अभिप्राय ॥
कळल्याविण कित्येक जीव। उगेच बोलती ॥ ९ ॥
उगेच बोलती मूर्खपण। शहाणपण वाढाया कारणें ॥
तृप्तिलागीं उपाय करणें। ऐसें झालें ॥ १० ॥
जेहिं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून ठेले ॥
येर ते बोलताचि राहिले। करंटे जन ॥ ११ ॥
विचारें इह लोक परलोक ॥ विचारें होतसे सार्थक ॥
विचारें नित्यानित्य विवेक। पाहिला पाहिजे ॥ १२ ॥

## दशक १९ समास २ विवरणनिरूपण.

प्रवृत्ति अथवा निवृत्ती। प्रचितीविण अवघी भ्रांती॥
गळंग्यामधील जगज्जोति। चेतेल कोठें ॥ १ ॥
हेत समजोन उत्तर देणें। दुसऱ्याचे जीवींचें समजणें॥
मुख्य चातुर्याचीं लक्षणें। ते हे ऐसीं ॥ २ ॥

---

१ वर्म.

बहुत बोलणें ऐकावें । तेथें मौन्याचि धरावें ॥
अल्पाचिन्हें समजावें । जगदंतर ॥ ३ ॥
बाष्कळामध्यें बैसों नये । उद्धटासी तंडों नये ॥
आपणा करितां खंडों नये । समाधान जनाचें ॥ ४ ॥
नेणतपण[1] सोडूं नये । जाणपणें फुगों नये ॥
नाना जनाचें हृदय । मृदु शब्दें उकलावें ॥ ५ ॥
प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसी जो[2]जु घेऊं नका ॥
खरें असतांचि नासका । फ[3]ड होतो ॥ ६ ॥
अंतर आर्ताचें शोधावें । प्रसंगीं थोडेंचि वाचावें ॥
चटक लाउनी सोडावें । भल्या मनुष्यासी ॥ ७ ॥
उत्तम गुण प्रगटवावे । मग भलत्यासी बोलतां फावे ॥
भले पाहोन करावे । शोधून मित्र ॥ ८ ॥
उपासनेसारिखें बोलावें । सर्व जनास तोषवावें ॥
सगट बरेंपण राखावें । कोणी एकासी ॥ ९ ॥
ठायीं ठायीं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा ॥
प्राणीमात्र बोलवावा । आप्तपणें ॥ १० ॥
उंच नीच ह्मणों नये । सकळांचें निववावें हृदय ॥
आस्तमानीं जाऊं नये । कोठेंतरी ॥ ११ ॥

---

१ अज्ञानपणा २ भांडण ३ सभा.

जगामध्यें जगमित्र । जिव्हेपासीं[1] आहे सूत्र ॥
कोठें तरी सत्पात्र । शोधून काढावें ॥ १२ ॥
कथा होती तेथें जावें । दुरी दीनासारिखें बैसावें ॥
तेथील सकळ हाद घ्यावें । अंतर्यामीं[2] ॥ १३ ॥
तेथें भले आढळती । व्यापक तेहि कळों येती ॥
हळु हळु मंदगती । रीग[3] करावा ॥ १४ ॥
सकळामध्यें विशेष श्रवण । श्रवणाहून थोर मनन ॥
मननें होय समाधान । बहुत जनांचें ॥ १५ ॥
धूर्तपणें सकळ जाणावें । अंतरीं अंतर जाणावें ॥
समजल्याविण शिणावें । कासयासी ॥ १६ ॥

## दशक १९ समास ३ करंटलक्षणनिरूपण

करंटयास आळस आवडे । यत्न कदापि नावडे ॥
त्याची वासना वावडे[4] । अधर्मी सदा ॥ १ ॥
दीर्घ सूचना सुचेचिना । न्याय नीति हे रुचेना ॥
परअभिलाषी वासना । निरंतर ॥ २ ॥
जनास मैत्री करीना । कठिण[5] शब्द बोले नाना ॥
मूर्खपणें आवरेना । कोणी एकासी ॥ ३ ॥

---

१ जीभेपाशीं २ अंतःकरणांत ३ प्रवेश करावा ४ फिरे ५ तीव्र.

कोणीएकास विश्वास नाहीं। कोणी एकासी सख्य नाहीं॥
विद्यावैभव[1] कांहींच नाहीं। उगाच ताठा[2] ॥ ४ ॥

राखावीं बहुतांचीं अंतरें। भाग्य येतें तदनंतरें।
ऐसीं हीं विवेकाचीं उत्तरें। ऐकणार नाहीं ॥ ५ ॥

कांहीं नेमकेपण[3] आपलें। बहुत जनास कळों आलें॥
तेंचि मनुष्य मान्य झालें। भूमंडळीं[4] ॥ ६ ॥

झिजल्यावांचून कीर्ती कैची। मान्यता न्हे फुकाची[5]।
जिकडे तिकडे होते चीची[6]। अवलक्षणें ॥ ७ ॥

भल्याची संगती धरीना। आपणास शहाणें करीना॥
तो आपला आपणं वैरी जाणा। स्वहित नेणे ॥ ८ ॥

## दशक १९ समास ४ सदेवलक्षणनिरूपण

उपजत[7] गुण शरीरीं। परोपकारी नानापरी॥
आवडे सर्वांचे अंतरीं। सर्वकाळ ॥ १ ॥

कोणाचें मनोगत तोडीना। भल्याची संगती सोडीना॥
सदेवलक्षण अनुमाना। आणून ठेवी ॥ २ ॥

---

१ मोठेपणा २ गर्व ३ नियमितपणा ४ पृथ्वीमध्यें ५ फुकट ६ फाजिती ७ नैसर्गिक-जन्मतः अंगीं असलेले.

तो सफळ व्हावा । जेथें तेथें नित्य नवा ॥
मूर्खपणें अनुमान गोवा[1] । कांहींच नाहीं ॥ ३ ॥
राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर ॥
नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ४ ॥
नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे ॥
बोलों[2] ऐसें वर्तों जाणे । उत्तम क्रिया ॥ ५ ॥
जो मानला बहुतांशीं । कोणी बोलों न शके त्यासी ॥
धगधगीत पुण्यराशी । महापुरुष ॥ ६ ॥
तो परोपकार करिताचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ॥
मग काय उणें तयाला । भूमंडळीं ॥ ७ ॥
सकळांसीं नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें ॥
अखंड कोणीएकाचें उणें । पडोंच नेदी ॥ ८ ॥
न्याय नीति भजन मर्यादा । काळ सार्थक करी सदा ॥
दरिद्रपणाची आपदा[3] । तेथें कैंची ॥ ९ ॥
प्रपंचीं जाणे राजकारण । परमार्थी साकल्य[4] विवरण ॥
सर्वांमध्यें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ १० ॥
मागें एक पुढें एक । ऐसा कदापि नाहीं दंडक[5] ॥
सर्वत्रासी अलोकिक । तया पुरुषाची ॥ ११ ॥

---

१ गुंतागुंत २ बोलण्याप्रमाणें ३ आपत्ति—संकट ४ पूर्ण ५ रीति.

३७२०

अंतरासी[1] लागेल ढका[2] । ऐसी वर्तणूक करूं नका ॥
जेथें जेथें विवेका । प्रगट करी ॥ १२ ॥
आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर ॥
तैसाचि परोपकार । मनापासुनी ॥ १३ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखावे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ॥
अवघेचि[3] सुखी असावे । ऐसी वासना[4] ॥ १४ ॥
उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी ॥
तैसी अवघ्याची चिंता करी । महापुरुष ॥ १५ ॥
जयास कोणाचें सोसेना । तयाची निःकांचनें[5] वासना ॥
धिक्कारिल्यां धिक्कारेना । तो महापुरुष ॥ १६ ॥
बहुतांस वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार ॥
धीर उदार गंभीर । महापुरुष ॥ १७ ॥
जितके कांहीं उत्तम गुण । तितकें समर्थाचें लक्षण ॥
अवगुण ते करंटलक्षण । सहजचि झालें ॥ १८ ॥

दशक १९ समास ६ बुद्धिवादनिरूपण

स्वतः निस्पृह असेना । त्याचें बोलणेंचि मानेना ॥
कठीण आहे जनार्दना[6] । राजी राखणें ॥ १ ॥

---

१ मनाला २ दुःख ३ सर्वलोक ४ इच्छा ५ द्रव्यरहित ६ जनाला ( जनीं जनार्दन ).

भावास भाऊ उपदेश देती । पुढें ढें होते फाजिती ॥
ओळखीच्या लोकांत महंती । मांडूंचि नये ॥ २ ॥
कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें ॥
विवेकबळें जन लावावें । भजनाकडे ॥ ३ ॥
परांतर रक्षायाचीं कामें । बहुत कठीण विवेकवर्में ॥
स्वइच्छेनें स्वधर्में । लोकराहाटी ॥ ४ ॥
उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें ॥
निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ ५ ॥
दीक्षा बरी मैत्री बरी । तीक्ष्ण बुद्धि राजकारणी बरी ॥
आपणास राखे नानापरी । अलिप्तपणें ॥ ६ ॥
अखंड हरिकथेचा छंदु । सकळांस लागे नामवेधु ॥
प्रगटे जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा ॥ ७ ॥
दुर्जनासी राखों जाणे । सज्जनासी निववूं जाणे ॥
सकळांचे मनीचें जाणे । ज्याचे त्यापरी ॥ ८ ॥
जेथें तेथें नित्य नवा । जनास वाटे हा असावा ॥
परंतु लालचीचा गोवा । पडोंचि नेदी ॥ ९ ॥
उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन ॥
उत्कट योग अनुष्ठान । ठायीं ठायीं ॥ १० ॥

---

१ मोठेपणा २ विचाराचें रहस्य ३ मोठेपण ४ व्रत ५ स्पष्ट ६ ज्ञान ७ लोभाचा.

उत्कट निस्पृहता धरिली । त्याची कीर्ति दिगंतें[1] फांकली[2] ॥
उत्कट भक्तीनें निवाली[3] । जनमंडळी ॥ ११ ॥
कांहींएक उत्कटेंविण । कीर्ति कदापि न व्हे जाण ॥
उगेंच वणवण हिंडोन । काय होतें ॥ १२ ॥
आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तत्काळ ॥
होईना त्यास निवळ । विवेक उमजावा[5] ॥ १३ ॥
विवेकामध्यें सांपडेना । ऐसें कांहींच असेना ॥
एकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ॥ १४ ॥
अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहतां काय उणें तेथें ॥
एकांतेंविण प्राणीयातें । बुद्धि कैंची ॥ १५ ॥
एकांतीं विवेक करावा । आत्माराम ओळखावा ।
एथुन तेथवरी गोवा । कांहींच नाहीं ॥ १६ ॥

## दशक १९ समास ७ यत्ननिरूपण

थोडें बोलोनी समाधान करणें । रागेजोन तरी मन धरणें ।
मनुष्य वेधीं[6] लावणें । कोणी एक ॥ १ ॥
कोण कोण राजी[7] राखिले । कोण कोण मनीं भंगिले[8] ॥
क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ॥ २ ॥

---

१ चोहीकडे–सर्व दिशांस २ पसरली ३ प्रसन्न झाली ४ सैरावैरा ५ करावा ६ नादीं ७ खुषी ८ दुखविले.

जिकडे तिकडे कीर्ति सोजे[1] । सगट लोकांस हव्यास[2] उपजे ॥
लोक राजी राखोन कीजे[3] । सकळ कांहीं ॥ ३ ॥
पर[4]लोकीं वास करावा । समुदाव उगाच पहावा ॥
मागण्याचा तगादा न लावावा । कांहींएक ॥ ४ ॥
जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक ॥
रात्री दिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ॥ ५ ॥
जो जो लोक दृष्टीस पडला । तो तो नष्ट[5] ऐसा कळला ॥
अवघे नष्ट एकला भला । कशावरुनी ॥ ६ ॥
ओस[6] मुलखीं काय पहावें । लोकांवेगळें कोठें राहावें ॥
तऱ्हे खोटी सांडतें घ्यावें । कांहींएक ॥ ७ ॥
तस्मात् लोकीं वर्ततां नये । त्यास महंती[7] कामा नये ॥
पर[8]त्र साधनाचा उपाय । करून असावें ॥ ८ ॥
अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोन असावें ॥
प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ॥ ९ ॥
मंद हळु हळु चालतो । चपळ कैसा आटोपतो ॥
अरबी फिरविणार तो । कैसा असावा ॥ १० ॥

---

१ जोरानें पसरतें २ आवड ३ करावें ४ दुसऱ्या ठिकाणीं ५ वाईट ६ ओसाड ७ महंतपणा ८ दुसऱ्या लोकांच्या.

हे धकाधकीचीं कामें । तीक्ष्ण बुद्धीचीं वर्में ॥
भोळ्या भावार्थे संभ्रमें । कैसें घडतें ॥ ११ ॥

शेत केलें परी वाहेना[1] । जवेर[2] केलें परी फिरेना ॥
जन मेळविलें तरी धरेना । अंतर्यामीं[3] ॥ १२ ॥

चढती वाढती आवडी उठे । तरी परमार्थ प्रगटे ॥
घसघस[4] करितां विटे । सगट[5] लोक ॥ १३ ॥

आपलें लोकांस मानेना । लोकांचें आपणास मानेना ॥
अवघा विकल्पचि[6] मना । समाधान कैचें ॥ १४ ॥

नासक दीक्षा सिंतरुँ[7] लोक । तेथें कैचा असेल विवेक ॥
जेथें बळावला अविवेक । तेथें राहणें खोटें ॥ १५ ॥

संगीत[8] चालिला तरी तो व्यापे[9] । नाहीं तरी अवघाचि संताप ॥
क्षणक्षणा विक्षेप[10] । किती म्हणोनी सांगावा ॥ १६ ॥

मूर्ख मूर्खपणें भरंगळती[11] । ज्ञाते ज्ञातेपणें कळहो करिती ॥
होते दोहींकडे फजिती । लोकांमध्यें ॥ १७ ॥

---

१ कष्ट करीना २ जवाहीर ३ अंतकरणांत ४ त्रास ५ सर्व ६ संशय ७ ठक ८ सुव्यवस्थित ९ पसारा १० अडथळा ११ बरळतात.

कारभार आटोपेना करवेना। आणि उगेंही राहवेना ॥
याकारणें सकळ जना । काय करावें ॥ १८ ॥
नासक उपाधीस सोडावें । वय सार्थकीं घालावें ॥
परिभ्रमणें कंठावें। कोठें तरी ॥ १९ ॥
परिभ्रमण करीना । दुसऱ्याचें कांहींच सोसीना ॥
तरी मग उदंड यातना। विकल्पाची ॥ २० ॥
आतां हें आपणाचि पाशीं । बरें विचारावें आपणासी ॥
अनुकूल पडेल तैसी। वर्तणूक करावी ॥ २१ ॥

## दशक १९ समास ८ उपाधीलक्षणनिरूपण.

सृष्टीमध्यें बहुलोक । परिभ्रमणें[1] कळे कौतुक ॥
नाना प्रकारींचे लोक। आढळों लागती ॥ १ ॥
किती प्रपंची जन । अखंड[2] वृत्ति उदासीन ॥
सुखदुःखें समाधान । दंडळेना[3] ॥ २ ॥
स्वभावेंचि[4] नेमक[5] बोलती । सहजचि नेमक चालती ॥
अपूर्व बोलण्याची स्थिती । सकळांस माने ॥ ३ ॥
सहजचि ताळज्ञान येतें । स्वभावेंचि रागज्ञान उमटतें ॥
सहजचि कळत जातें । न्यायनीति लक्षण ॥ ४ ॥

---

१ फिरल्यानें २ सर्वकाळ ३ डळमळेना ४ सहज ५ नियमित.

एखादा आढळे गार्जी[1] । सकळ लोक अखंड राजी ॥
सदा सर्वदा आवडी ताजी । प्राणिमात्राची ॥ ५ ॥
चुकोन उदंड आढळतें । भारी मनुष्य दृष्टीस पडतें ॥
महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ॥ ६ ॥
सकळगुणामध्यें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण ॥
मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ॥ ७ ॥
मोठीं राजकारणें चुकतीं । राजकरणीं वेढा लागती ॥
नाना चुकीची फजीती । चहूंकडे ॥ ८ ॥
या कारणें चुकों नये । ह्मणिजे उदंड उपाये ॥
उपायाचा अपाय । चुकतां होये ॥ ९ ॥
व्यापेंविणें[2] आटोप केला । तो अवघा घसरताचि गेला ॥
अकलेचा बंद नाहीं घातला । दुरी[3] दृष्टीनें ॥ १० ॥
त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणें येऊन आटोपाव्या[4] ॥
ज्याच्या त्यानें कराव्या । बळकट बुद्धी ॥ ११ ॥
ज्यासी उपाधी आवरेना । तेणें उपाधी वाढवावीना ॥
सावचित करूनियां मना । समाधानें असावें ॥ १२ ॥
धांवधांवो उपाधी वेष्टी । आपण कष्टी लोकही कष्टी ॥

---

१ पराक्रमी, श्रेष्ठ २ व्याप=पसारा ३ दूरदृष्टीनें ४ संभाळाव्या.

हे कामा नये गोष्टी । कुसमुसेची ॥ १३ ॥
लोक बहुत कष्टी झाला । आपणहि अत्यंत त्रासला ॥
व्यर्थचि केला गल्बला । कासयासी ॥ १४ ॥
असो उपाधीचें काम ऐसें । कांहीं बरें कांहीं काणोसें ॥
सकळ समजोन ऐसें । वर्ततां बरें ॥ १५ ॥
अंतरात्म्याकडे सकळ लागे । निर्गुणीं हें कांहींच नलगे ॥
नाना प्रकारीचे दगे । चंचळांमध्यें ॥ १६ ॥
शुद्ध विश्रांतीचें स्थळ । तें एक निर्मळ निश्चळ ॥
तेथें विकाराचि सकळ । निर्विकार होती ॥ १७ ॥
उद्वेग अवघे तुटोन जाती । मनासी वाटे विश्रांती ॥
ऐसी दुर्लभ परब्रह्मस्थिती । विवेकें सांभाळावी ॥ १८ ॥
आपणास उपाधि मुळींच नाहीं । ऋणानुबंधें[1] मिळाले सर्वही
आल्यागेल्याची क्षिती नाहीं । ऐसें झालें पाहिजे ॥ १९ ॥
जो उपाधीस कंटाळला । तो निवांत होऊन बैसला ॥
आटोपेना तो गल्बला । कासयासी ॥ २० ॥
कांहीं गल्बला कांहीं निवळ[2] । ऐसा कंठीत[3] जावा काळ ॥
जेणें कारितां विश्रांतिवेळ ॥ आपणासी फावे ॥ २१ ॥

---

१ पूर्वसंचिताप्रमाणें २ शांत ३ घालवीत.

उपाधी कांहीं राहात नाहीं। समाधानायेवढें थोर नाहीं ॥
नरदेह प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा ॥ २२ ॥

## दशक १९ समास ९ राजकारण

ज्ञानी आणि उदास[1] । समुदायाचा हव्यास ॥
तेणें अखंड सावकास । एकांत सेवावा ॥ १ ॥
जेथें तजविजा कळती । अखंड चाळणा[2] निघती ॥
प्राणिमात्रांची स्थिति । कळों येते ॥ २ ॥
अखंड राहतां सलगी होते। अतिपरिचयें अवज्ञा घडते ॥
याकारणें विश्रांतीतें । घेतां नये ॥ ३ ॥
आळसें आळस केला । तरी मग कारभाराचि बुडाला ॥
अंतरहेत[3] चुकत गेला । समुदायाचा ॥ ४ ॥
उदंड उपासनेचीं कामें । लावींत जावीं नित्य नेमें ॥
अवकाश कैसा कृत्रिमें[4] । करावयासी ॥ ५ ॥
चोर भांडारी[5] करावा । घसरतांच सांभाळावा ॥
गोवा मूर्खपणाचा काढावा । हळु हळु ॥ ६ ॥
या अवघ्या पहिल्याच[6] गोष्टी । प्राणी कोणी न्हतां कष्टी
राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ ७ ॥

---

१ उदासीन २ विचार ३ अपमान ४ हलकीं-कपटाचीं कामें ५ खजिन्याचा मालक ६ जुन्या.

नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ॥
आपणावरी विकल्पाचे[1] गोवे । पडोंच नेदी ॥ ८ ॥
कांटीनें कांटी झाडावी । झाडावी परी ते कळों नेदावी ॥
कळकटेपणाची[2] पदवी । असों द्यावी ॥ ९ ॥
न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळचि होतें ॥
गचगचेंत[3] पडतां तें । चमत्कारें नव्हे ॥ १० ॥
कोणीएक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें ॥
या कारणें ढिलेपण तें । असोंचि नये ॥ ११ ॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला ॥ त्याचा कार्यभाग बुडाला ॥
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १२ ॥
अवघ्यास अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडिलें ॥
या कारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥ १३ ॥
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकाकरवीं करवावें ॥
कित्तेक खलक[4] उगवावे । राजकारणामध्यें ॥ १४ ॥
बोलके पहिलवान कळकटे[5] । तयासीच घ्यावे झटे ॥
दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥ १५ ॥
खळ दुर्जनासी भ्याले । राजकारण नाहीं राखिलें ॥
तेणें अवघे प्रगट झाले । बरे वाईट ॥ १६ ॥

---

१ संशयाचे २ भांडखोरपणाची ३ गाजावाज्यांत ४ कारस्थानी लोक ५ भांडखोर.

दुर्जन प्राणी समजावे[1] । परी ते प्रगट न करावे ॥
सज्जनापरीस आळवावे । महत्व देउनी ॥ १७ ॥
जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट[2] ॥
या कारणें ते वाट । बुझूनि[3] टाकावी ॥ १८ ॥
हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें[4] ॥
दिलेपणाच्या संभ्रमें[5] । जाऊं नये ॥ १९ ॥
कोठेंच पडेना दृष्टी । ठायीं ठायीं त्याच्या गोष्टी ॥
वाग्विळासें[6] सकल सृष्टी । वेधिली तेणें ॥ २० ॥
हुंब्यास हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास[7] पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥ २१ ॥
धटासी[8] आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ॥
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥ २२ ॥
जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी[9] थाटे ॥
इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ॥ २३ ॥

**दशक १९ समास १० विवेकलक्षणनिरूपण**

जेथें अखंड नाना चाळणा[10] । जेथें अखंड नाना धारणा ॥
जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती ॥ १ ॥

---

१ प्रसन्न करावें २ त्रास ३ बंद करून ४ नियमितपणानें ५ भ्रमानें ६ वक्तृत्वानें ७ मूर्खास ८ धटिंगणासी ९ सभा १० विवेक.

सृष्टीमध्यें उत्तम गुण । तितुकें चाले निरूपण ॥
निरूपणाविण क्षण । रिकामा नाहीं ॥ २ ॥
प्रबंधीचीं[1] पाठांतरें[2] । उत्तरासी संगीतें[3] उत्तरें ॥
नेमक बोलतां अंतरें । निर्वंवी[4] सकळांचीं ॥ ३ ॥
उपासना करूनियां पुढें । पुरवले पाहिजे चहुंकडे ॥
भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया ॥ ४ ॥
जाणती परी आढळेना । काय करितो तें कळेना ॥
नाना देशीचे लोक नाना । येऊन जाती ॥ ५ ॥
तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं ॥
कडोविकडीचीं विवरावीं । अंतःकरणें ॥ ६ ॥
किती लोक तें कळेना । किती समुदाय आकळेना[5] ॥
सकळ श्रवणमनना- । मध्यें घाली ॥ ७ ॥
फड समजाविस करणें । गद्यपद्य सांगणें ॥
परांतरासी राखणें । सर्वकाळ ॥ ८ ॥
जितुकें कांहीं आपणास ठावें[6] । तितकें हळुहळु शिकवावें ॥
शहणे करून सोडावे । बहुत जन ॥ ९ ॥
होईल तें आपण करावें । न होतां जना-करवीं[7] करवावें ॥
भगवद्भजन रहावें । हा धर्म नव्हे ॥ १० ॥

---

१ काव्याचीं २ पाठ म्हणणें ३ सुव्यास्थित-पद्य ४ प्रसन्न करी ५ समजेना ६ माहीत आहे ७ कडून.

आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें ॥
आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ॥ ११ ॥
जुन्या लोकांचा कंटाळा आला । तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला ॥
जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ॥ १२
देहाचा अभ्यास बुडाला । म्हणजे महंत बुडाला ॥
लोगवेगें[1] नूतन लोकाला । शहाणे करावे ॥ १३
उपाधींत सांपडों नये । उपाधीस कंटाळों नये ॥
निसुगपणा[2] कामा नये । कोणीएका विषयीं ॥ १४ ॥
धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ॥
नाना बुद्धि शक्ताला । म्हणून शिकवाव्या ॥ १५ ॥
व्याप होईल तो राहावें । व्याप राहातां उठोन जावें ॥
आनंदरूप फिरावें । कोठें तरी ॥ १६ ॥
उपाधीपासून सुटला । तो निस्पृहपणें बळावला ॥
जिकडे अनुकूल तिकडे चालिला । सावकाश ॥ १७ ॥

### दशक २ समास २ उत्तमलक्षण

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखिल्याविण खाऊं नये ॥
पडिली वस्तु घेऊं नये । एकाएकीं ॥ १ ॥

---

१ लवकर २ आळस.

आतिवाद करूं नये । पोटीं[1] कपट धरूं नये ॥
शोधिल्याविण करूं नये । कुलहीन कांता ॥ २ ॥
विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये ॥
मर्यादेविण हालों नये । कांहीं एक ॥ ३ ॥
जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ॥
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ ४ ॥
निंदा द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये ॥
द्रव्यदारा हेरूं[2] नये । बलात्कारें ॥ ५ ॥
क्षणक्षणा रुसों नये । लटका पुरुषार्थ बोलों नये ॥
केल्याविण सांगों नये । आपला पराक्रम ॥ ६ ॥
बोलिला बोल विसरों नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये ॥
केल्यावीण निखंदूं[3] नये । पुढिलांसी कदा ॥ ७ ॥
सुखा अंग देऊं नय । प्रयत्न पुरुषें सांडूं नये ॥
कष्ट करितां त्रासूं नये । निरंतर ॥ ८ ॥
बहुत चिंता करूं नये । निसुगपणें[4] राहों नये ॥
परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ॥ ९ ॥

---

१ अंतःकरणांत २ हरण करूं नये ३ तिरस्कार करूं नये ४ आळसानें.

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ॥
परपीडा करूं नये । विश्वासघात ॥ १० ॥
धूम्रपान[1] घेऊं नये । उन्मत्त द्रव्य सेवूं नये ॥
बहुचकांसी[2] करूं नये । मैत्री कदा ॥ ११ ॥
कामेवीण राहूं नये । नीच उत्तर साहों नये ॥
आसुदें[3] अन्न खाऊं नये । वडिलांचेंहि ॥ १२ ॥
चहाडी चोरी करूं नये । परद्वार करूं नये ॥
मागें उणें बोलों नये । कोणी एकाचें ॥ १३ ॥
समयीं यावा[4] चुकों नये । सत्व गुण सांडूं नये ॥
वैरियास दंडूं नये । शरण आलिया ॥ १४ ॥
स्नानसंध्या सांडूं नये । कुलाचार खंडूं नये ॥
अनाचार मांडूं नये । चुकुरपणें ॥ १५ ॥
हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये ॥
परमार्थास मोडूं नये । प्रपंच बळें ॥ १६ ॥
सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये ॥
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ १७ ॥

---

१ मद्यपान २ वाचाळासी ३ आयतें ४ धैर्य.

## दशक २ समास ९ विरक्तलक्षण.

ऐका विरक्ताचीं लक्षणें । विरक्तें असावें कोण्या गुणें ।
जेणें अंगीं सामर्थ्य बाणे[1] । योगियांचें ॥ १ ॥
जेणें सत्कीर्ति वाढे । जेणें सार्थकता घडे ॥
जेणें करितां महिमा चढे । विरक्तासी ॥ २ ॥
जेणें सुख उचंबळे । जेणें सद्विद्या वोळे[2] ॥
जेणें भाग्यश्री प्रबळे । मोक्षेंसहित ॥ ३ ॥
विरक्तें विवेकें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें ॥
विरक्तें धारिष्ट धरावें । दमनविषयीं[3] ॥ ४ ॥
विरक्तें भक्ति वाढवावी । विरक्तें शांति दाखवावी ॥
विरक्तें यत्नें करावी । विरक्ति आपुली ॥ ५ ॥
विरक्तें परमार्थ उजळावा । विरक्तें विचार शोधावा ॥
विरक्तें संन्निध ठेवावा । सन्मार्ग सत्वगुण[4] ॥ ६ ॥
विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें सांक्षेप[5] धरावा ॥
विरक्तें वक्तृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ॥ ७ ॥
बहुतास करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार ॥
पुण्य मार्गाचा विस्तार । बळेंचि करावा ॥ ८ ॥

---

१ ठसतें २ प्रसन्न होते ३ इंद्रियदमनाविषयीं ४ जवळ ५ प्रयत्न.

स्नानसंध्या जपध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन ॥
नित्यनेम पवित्रपण । अंतर शुद्ध असावें ॥ ९ ॥
दृढ निश्चयो धरावा । संसार सुखाचा करावा ॥
विश्वजन[1] उद्धरावा । संसर्गमात्रें[2] ॥ १० ॥
विरक्तें असावें अंतर्निष्ट । विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट ॥
विरक्तें न व्हावें कनिष्ठ । पराधीनपणें ॥ ११ ॥
विरक्तें समय जाणावा । विरक्तें प्रसंग ओळखावा ॥
विरक्त चतुर असावा । सर्व-प्रकारें ॥ १२ ॥
हरि-कथा निरूपण । सगुण भजन ब्रह्मज्ञान ॥
पिंडज्ञान तत्वज्ञान । सर्व जाणावें ॥ १३ ॥
कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ॥
प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । सफळ जाणावें ॥ १४ ॥
विरक्तें असावें जगमित्र । विरक्तें असावें स्वतंत्र ॥
विरक्तें असावें जगमित्र । बहुगुणी ॥ १५ ॥
विरक्तें उत्तम गुण घ्यावे । विरक्तें अवगुण त्यागावे ॥
नाना अपाय भंगावे । विवेकबळें ॥ १६ ॥

---

१ सर्व लोक २ केवळ संगतीनें.

# भाग २ रा

## ( दासबोधेतर ग्रंथांतील )

(१) हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपीं वेली गेली ॥
श्रीरामभक्तीनें फळली । **रामदासबालिया**[1] नांवें ॥ १ ॥
आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें दैवत ॥
तयाविण आमुचा परमार्थ । सिद्धीतें न पावे कीं ॥ २ ॥
साह्य[2] आम्हासी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ ॥
**गुरु श्रीरामसमर्थ** । काय उणें दासासी ॥ ३ ॥
दाता[3] एक रघुनंदन । वरकड[4] लेंडी[5] देईल कोण ॥
ते सोडोन आम्ही जन । कोणाप्रति मागावें ॥ ४ ॥
म्हणोनि आम्ही **रामदास** । रामचरणीं आमुचा विश्वास ॥
कोसळोनि पडो रे आकाश । आणि-काची वास[6] न पाहूं ॥ ५ ॥
स्वरूपसांप्रदाय अयोध्यामठ । जानकी देवी रघुनाथ दैवत ॥
मारुति उपासक नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ॥ ६ ॥

(२) आदिनारायण सद्गुरु आमुचा ॥
शिष्य त्याचा झाला महाविष्णु ॥ १ ॥

---

१ पाठभेद—रामदास बोले २ मदत ३ देणारा ४ दुसरा, इतर ५ भितरा ६ वाट.

तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस ॥
तेणें ब्रह्मयास उपदेशिलें ॥ २ ॥
ब्रह्मदेवें केला उपदेश वसिष्ठा ॥
तेथें धरा निष्ठा शुद्ध भावो ॥ ३ ॥
वसिष्ठ उपदेशी श्रीरामरायासी ॥
**रामें रामदासीं उपदेशिलें** ॥ ४ ॥

उपदेश देवोनि दिधला[1] मारुति ॥
स्वयें रघुपती निरवीता ॥ १ ॥
निरवितां तेणें झालों रामदास ॥
**संसारीं उदास** म्हणोनिया ॥ २ ॥
म्हणोनि आमुचे कुळीं कुळदैवत ॥
राम हनुमंत आत्मरूपी ॥ ३ ॥
आत्मरूपीं झाला रामीरामदास ॥
केला उपदेश दीनोद्धारा ॥ ४ ॥

(३) नमो अधिष्ठाता[2] विष्णु मुख्य साधु ॥
तेथूनिया बोधु विधी[3] लागीं ॥ १ ॥
विधीपासुनियां ज्ञान विधिसुता[4] ॥
तेंचि ज्ञान प्राप्त वसिष्ठासी ॥ २ ॥

---

१ दिला २ आधार ३ ब्रह्मदेव ४ पराशर.

वसिष्ठें उपदेश केला रामचंद्रा ॥
तोचि महारुद्रा हनुमंता ॥ ३ ॥
हनुमंत कलीमाजि चिरंजीव ॥
झाले देव सर्व बौद्धरूप ॥ ४ ॥
बौद्ध नारायण होउनी बैसला ॥
उपाव[2] बोलिला व्यासमुनि ॥ ५ ॥
व्यासमुनि बोले भविष्य पुराण ॥
जग उद्धरणें कलीमाजीं ॥ ६ ॥
कलीमाजी गोदातीरीं पुण्यक्षेत्र ॥
तेथें वातपुत्र[3] अवतरे ॥ ७ ॥
अवतरे[4] अभिधानी रामदास ॥
कृष्णातीरीं वास जगदुद्धारा ॥ ८ ॥
जगदुद्धारासाठीं श्रीरामा सांकडें[6] ॥
केलें वाडें कोडें भक्तिपंथें ॥ ९ ॥
भक्तिपंथें मोठा केला श्रीरामानें ॥
जंबू[7] अभिधानें ग्राम तेथें ॥ १० ॥

---

१ कलियुगामध्यें २ उपाय ३ वायूचा मुलगा ४ अवतार घेईल ५ अभिधान नांव ६ संकट ७ जंबूग्राम -जांब नावाचें गांव.

तेथें ब्रह्मनिष्ठ अधिष्ठाता पूर्ण ॥
सूर्यनामा जाण द्विजवेर्य[1] ॥ ११ ॥
द्विजवर्य सूर्य जैसा तपोधन ॥
अद्भुत विंदान[2] झालें तेथ ॥ १२ ॥

झाली रामनवमी मध्यें अष्टमीसी ॥
अर्धरात्रीं त्यासी दूत आले ॥ १३ ॥
दूत आले पुढें घालोनि चालिले ॥
महाद्वारा आले भीम[3] जेथें ॥ १४ ॥
भीम देवालयीं नेऊनी तयासी ॥
तेथें उभयतासी देखियेलें ॥ १५ ॥
देखियले राजपुत्र सूर्यवंशीं ॥
झांपड नेत्रासी पडे तेव्हां ॥ १६ ॥
पडे तेव्हां जसा दंडवत भूमीं ॥
मग अंतर्यामीं बोलविलें ॥ १७ ॥
बोलावूनि माथां[4] ठेवी सव्यपाणी[5] ॥
मंत्र सांगे कर्णीं रामनाम ॥ १८ ॥

---

१ श्रेष्ठ ब्राह्मण २ लीला, करणी ३ मारुति ४ मस्तकावर ५ उजवा हात.

नाम सांगुनीयां ताम्रमूर्ति रम्य ॥
पट्टाभिराम दिधला तया ॥ १९ ॥
तया दिला वर तुज पुत्र होतील ॥
ध्वज उभारतील रामदास्यें ॥ २० ॥
रामदास्य झालें धन्य वंशोद्धार ॥
बोलोनि सत्वर गैबं[1] झाले ॥ २१ ॥
झाला रामनवमी महोत्सव थोर ॥
मध्यान्हीं सत्वर जन्म झाला ॥ २२ ॥
जन्म झाला, झाला, देव वंशा आले ॥
उपासना चाले राघवाची ॥ २३ ॥
राघवाची भक्ति सुखाची विश्रांति ।
पितयांची[2] शांति झाली पुढें ॥ २४ ॥
पुढें ज्येष्ठ[3] बंधु न सांगेचि कांहीं ॥
सुखें देवालयीं निद्रा केली ॥ २५ ॥
निद्रा केली तेथें **श्रीरामें उठवूनी** ॥
**तोचि मंत्र कानीं सांगितला** ॥ २६ ॥
सांगितला बोध **रामीरामदासा** ॥
गुरूच्याही वंशा निरोपिलें ॥ २७ ॥

---

१ गुप्त २ पित्याची–बापाची ३ वडील भाऊ.

## समर्थांचें महंतांस आज्ञापत्र.

(४) विवेक झालिया देवाचा योग ॥
मग होणार नाहीं वियोग ॥
देव सर्वांचें अंतरंग । अखंडित भेटी ॥ १ ॥

या समाधानें असावें । निरूपणीं विवरावें ॥
मानसपूजनें आठवावें । सकळ कांहीं ॥ २ ॥

ऋणानुबंधें भेटी होईल । परस्परें समाचार कळेल ॥
सहज वर्तमान निवळेल । ते प्रसंगीं[1] ॥ ३ ॥

कांहीं समुदाव करणें । येविषयीं आलस्य[2] न करणें ॥
आलस्य कारितां उदंड उणें । दिसेल परमार्थीं ॥ ४ ॥

पोहणारे बुडते तारावे । सामर्थ्यें बुडों नेदावे[3] ॥
मूर्ख ते शहाणे करावे । विवेकी पुरुषें ॥ ५ ॥

आपणाहून जो धींग[4] । त्यासी करूं नये प्रसंग ॥
आपणाधीन जो प्रसंग । तोचि करावा ॥ ६ ॥

सोईऱ्याधाईऱ्यांचीं मुलें । तीक्ष्ण बुद्धीचीं सखोलें ॥
तयासी बोलणें मृदुबोलें । करित जावें ॥ ७ ॥

---

१ वेळीं २ आलस ३ देऊं नये ४ वरचढ, बलिष्ठ ५ आप्तांचीं.

त्याचा संसार समाचार । पुसत जावा विस्तार ॥
उदंड सांगतां तत्पर । होऊनि ऐकावें ॥ ८ ॥
दुःख ऐकतां दुःख जातें । त्याचें दुःख हळु होतें ॥
मग तें सवेंचि धरितें । मित्रभावें ॥ ९ ॥
निकट मैत्री बरी होतां । मग त्यासी न्यावें एकांता ॥
म्हणावें रे भगवंता । कांहीं तरी भजावें ॥ १० ॥
पूर्वी देव पूजिला नव्हता । म्हणोनि आली दरिद्रता ॥
या कारणें अनंता । कांहीं तरी भजावें ॥ ११ ॥
मान्य होतां जप सांगावा । मग तो इकडे[1] पाठवावा ॥
मग तयाचा सकळ गोवा । उगवूं आम्ही ॥ १२ ॥

## सुंदरमठ

(५) परंतु एकवचनी देव एक । जेणें सोडिले देव अनेक ॥
सेवाहीन मी सेवक । त्याचा म्हणती ॥ १ ॥
समर्थें अंगिकार केला । नाना संकटीं रक्षिला ॥
त्याचिया अन्नें पिंडे[2] वाढविला । जन्मवरी ॥ २ ॥
मारुतीसारखे सेवक । तेथें मी मानवी रंक ।
नवल सामर्थ्याचें कौतुक । काय सांगों ॥ ३ ॥

---

१ कमी २ देह.

समर्थ आणि दीन-नाथ । वैभवें समर्थाहून समर्थ ॥
जेणें माझे मनोरथ । पूर्ण केले ॥ ४ ॥
जें जें मनें अभिळासिलें[1] । तें तें समर्थें पुरविलें ॥
मज दीनास वाढविलें । मर्यादे वेगळें ॥ ५ ॥
समर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणवावें ॥
त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥ ६ ॥
देवमात्र जाजावला[2] । म्हणोनी कैपक्षी[3] पावला ॥
भुवनकंटक निर्दाळिला[4] । दशमुख शत्रु ॥ ७ ॥
जिहीं[5] त्रैलोक्य जिंकिलें । त्यास मर्कटा हातीं[6] मारविलें ॥
भुवनत्रय आनंदविलें । दाशरथीनें ॥ ८ ॥
बिभीषणास दिधली लंका । सुरवरांची फिटली शंका ॥
समर्थें रामदास-रंका । नवाजिलें[7] ॥ ९ ॥
सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण ॥
सुंदर मठीं देव आपण । वास[9] केला ॥ १० ॥
सुंदर पाहोन वास केला । दास संनिध ठेविला ॥
अवघा प्रांतचि पावन केला । कृपाळुपणें ॥ ११ ॥

---

१ इच्छिलें २ त्रासला ३ रक्षणकर्ता-कैवार घेणार ४ मारला ५ ज्यानें ६ माकडाकडून ७ वाखाणितो ८ किंकर-चाकर ९ वस्ती.

बावी[1] पोकरणी[2] झरे । टाकी[3] विशाळ सुंदरें ॥
ठायीं ठायीं विशाळ मनोहरें । स्थळें निर्मिलीं ॥ १२ ॥
कडे कपाटे दरे दर्कुटें । पाहों जातां भयचि वाटे ॥
ऐसे स्थळीं वैभव वाटे । देणें रघुनाथाचें ॥ १३ ॥
अंतर्निष्ठ अखंड ध्यानीं । संनिध रामवरदायिनी[4] ।
विश्वमाता त्रैलोक्यजननी । मूळमाया ॥ १४ ॥

## शिवाजीस पत्र

( ६ ) निश्चयाचा महामेरु । बहुत जनास आधारु ।
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ॥
तयाचे गुणमहत्त्वासी । तुळणा कैंची ॥ २ ॥
नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ॥
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ॥
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ४ ॥
आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ॥
सर्वज्ञपणें सुशील । सकळाठायीं ॥ ५ ॥
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ॥

---

१ विहिरी २ कुंड ३ तलाव ४ रामाला वर देणारी.

सावधपणें नृपवर[1] । तुच्छ केले ॥ ६ ॥
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ॥
सकळ पृथ्वी आंदोळली[2] । धर्म गेला ॥ ७ ॥
देवधर्म गोब्राह्मण । यांचें करावया संरक्षण ॥
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ॥
धूर्त तार्किक[3] सभानायक । तुमचे ठायीं ॥ ९ ॥
या मंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं ॥
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकारितां ॥ १० ॥
आणिकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनी कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं[4] विस्तारिली ॥ ११ ॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ॥
कित्येकांस आश्रय झाले । शिवकल्याण राजा ॥ १२ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ॥
ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणू ॥ १३ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हाप्रती ॥
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळली पाहिजे ॥ १४ ॥

---

१ थोर राजे २ हादरून गेली ३ तर्कशास्त्रांत प्रवीण
४ पृथ्वीमध्यें.

उदंड राजकारण तेटलें । तेणें चित्त विभागलें ॥
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

**समर्थ प्रतापगडास गेले असतां केलेलें तेथील**
**भवानीचें स्तोत्र.**

(७)प्रपंचीं आमचे कुळीं । तुळजा कुळदेवता ॥
नेणतां[1] ऐकिलें होतें । जाणतां[2] स्मरतें मनीं ॥ १ ॥
श्रेष्ठांचीं कामना[4] होती । पुत्रिंली मनकामना ॥
नौसें[5] जो नौसिला होता । तो त्यापासूनि चूकला ॥२॥
पुत्रचि घेतला त्यांचा । जोगी[6] करुनि सोडिला ॥
ख्यानति[7] दाविली मोठी । न्याय-नीति चुकेचि ना ॥३॥
वैराग्य घेतलें पोटीं[8] । सर्व संसार सांडिला ॥
तुझिया दर्शना आलों । कृपादृष्टी नवाजिलों ॥ ४ ॥
तुझा नवाजिला आहे । महंत म्हणती जनीं ॥
तुझेंचीं सर्वही देणें । सर्वही तुजपासुनी ॥ ५ ॥
संसारीं मोकळें केलें । आनंदीं ठाव दीधला ॥
तोडिली सर्वही चिंता । तूं माया सत्य जाहलें ॥ ६ ॥
पुर्विलें काय मी सांगों । इच्छा पूर्ण परोपरी ॥

---

१ राहिलें २ लहानपणीं ३ थोरपणीं ४ इच्छा ५ नवस ६ गोसावी ७ ख्याती ८ अंतःकरणांत.

मागील आठवेनासें । केलें, आश्चर्य वाटलें ॥ ७ ॥
सदानंदीं उदो[1] झाला । सुखसंतोष पावला ॥
पराधीनता गेली । सत्ता उदंड चालिली ॥ ८ ॥
उदंड ऐकिलें होतें । रामासीं वेरु[2] दीधला ॥
मी दास रघुनाथाचा । मज ही वरदायिनी ॥ ९ ॥
श्रेष्ठांचा नौस जो होता । तो मी फेडीनसें म्हणे ॥
पुष्प देउनि उतराई । ऐसें हें कल्पिलें मनीं ॥ १० ॥
तुळजापुर ठाकेना[3] । चालिली पश्चिमेकडे ॥
पारघाटीं जगन्माता । सैद्य[4] येउनी राहिली ॥ ११ ॥
ऐसें हें ऐकिलें होतें । हेत[5] तेथेंचि पावला ॥
पुष्पाची कल्पना होती । तेथें पुष्पचीं दीधलें ॥ १२ ॥
ऐसी तूं दयाळू माता । हेमपुष्पाचि[6] घेतलें ॥
संतुष्ट भक्तिभावानें । त्रैलोक्यजननी पहा ॥ १३ ॥
थोड्यानें श्लाघ्यता केली । थोर संतोष पावलों ॥
उत्तीर्ण[7] काय म्यां व्हावें । तुझे कृपेसी रोकडे ॥ १४ ॥
तुझेंची तूजला दिल्हें । म्यां हें कोठूनि आणिलें ॥
संकटें वारिलीं नाना । रक्षिलें बहुतांपरी ॥ १५ ॥

---

१ उदय २ वर ३ थांबेना ४ हल्लीं ५ हेतु–मनोरथ
६ सोन्याचें फूल ७ उतराई.

जीवांचें जाणते माता । तूं माता मज रोकडी ॥
लोकांच्या चुकती **माता** । अचूक जननी मला ॥१६॥
एकचि मागणें आतां । द्यावें तें मज्कारणें ॥
तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हाचि देखतां ॥१७॥
दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ॥
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥ १८ ॥
देवाचीं राहिलीं सत्वें । तूं सत्व पाहसी किती ॥
भक्तांसी वाढवी वेगीं । इच्छा पूर्ण परोपरी ॥ १९ ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ॥
क्षमावें ुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥ २० ॥

## रामास मागणें

(८)रामास इतुकें मागावें । जें आपण रामचि व्हावें ॥
कां रामासि दास करावें । आपणा ऐसें ॥ १ ॥
तूं ऐसा कां मीच असोन । त्याहून नलगे आम्हांसि आन ॥
तुझ्या ठायीं दासपण । आणीन तरी मी होय ॥२ ॥
तुवां स्वामी होऊनि बैसावें । आणि आम्हां सभोवतें भोंवावें ॥

१ लवकर २ प्रत्यक्ष ३ उत्कंठायुक्त ४ दुसरें ५ हिंडावें.

रागेजोनी बाहतां[1] न यावें । हें काय बरें ॥ ३ ॥
तूं राज्य सांडूनिया जालियां उदास । तरी आम्हींही तुझेचि दास ॥
त्वां काय बोलिजेल वापास । तैसें आम्हीही तुज करूं ॥ ४ ॥
तुवां पाषाण[2] तारिले । तरी आम्हीही जडजीव उद्धारिले ॥
तुवां देव मुक्त केले । बंधनापासूनी ॥ ५ ॥
तरी आम्हींही भाविकांसी[3] । सोडवूनियां मोक्षपदासी ॥
पाववितें तयासी । मागुतां जन्म नाहीं ॥ ६ ॥
तुवां जरामरण केळें दुरी । तें मुळींच नाहीं आमुचे घरीं ॥
तूं राजा अकरा सहस्त्रवरी[4] ॥ तरी आम्हांसी संख्या नाहीं ॥ ७ ॥
तुवा पुरी[5] नेली वैकुंठा । आम्ही वैकुंठीच्या बारा वाटा ॥
करूाने मांडिला चोहटा[6] । तया वैकुंठाचा ॥ ८ ॥
ऐसे बोलती रामदास । निघडे सर्वस्वें उदास ॥
वैभव वाटे जयांस । कसपट जैसें ॥ ९ ॥
ऐसें बोलणें ऐकिलें । रामें मंदहास्य केलें ॥
धांवोनिया हृदयीं धरिलें । आपुलिया निजदासा ॥ १० ।

---

१ बोलावितां २ दगड ३ श्रद्धाळु लोकांस ४ हजार ५ अयोध्यापुरी ६ चव्हाटा.

ऐसा भक्ताचा वेळाइत[1] । दासाभोंवतां[2] भोंवतें[3] ॥
एक क्षणीं न विसंबत । भावार्थ देखोनि भुलला ॥ ११ ॥
राम दासांमध्यें उभा । तेणें दासांसी आली शोभा ॥
रामस्वरूपाची प्रभा । कोंदाटली सबाह्य ॥ १२ ॥
रामें आपणांसारिखें केलें । दास दासपणेंसी मुकले ॥
रामासि मिळोनि एकचि झालें । एकपणाहीं वेगळे ॥ १३ ॥
स्वामी सेवकपणें आनंदले । हर्षें करूनि उचंबळले ॥
परस्परें गिळोनि ठेले । लोभ आला म्हणोनि ॥ १४ ॥
ऐसें देवाभक्तांचें सौजणें[4] । जीव घेणें जीव देणें ॥
पुन्हा मागुतें येणें जाणें । न घडे कदा ॥ १५ ॥
नवविधा भक्ति या कारणें । जें आपण स्वयें रामचि होणें ॥
स्वयेंचि रामपणें ठाकणें[5] । स्वानुभवें करूनी ॥ १६ ॥

**जप—॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥**

(९)प्राणी क्षीण झाला देहीं । वेढिला यमदूतांहीं ॥
तेव्हां सोडविता नाहीं । एक श्रीरामावाचुनी ॥ १ ॥
जेव्हां वैभवें हीन व्हावें । जीवलगीं वोसंडावें[6] ।

---

१ प्रसंगानुसार काम करणारा २ सभोंवार ३ फिरत ४ सख्य, मैत्री ५ उभें राहणें ६ सोडून जावें.

ते समयीं आपंगावें । कृपाळुपणें राघवें ॥ २ ॥
रामासीं कोणीच स्मरेना । परी राम माझा विसंबेना ॥
गुणदोष विचारीना । मायबाप विश्वाचा ॥ ३ ॥
राम जिवाचा जिव्हाळा । राम मनाचा कोंवळा ॥
राम जाणे अंतःकळा । निजदासाची ॥ ४ ॥
तेंहीं श्रीराम चिंतन । करावें भावार्थें करून ॥
तयासी भोवऱ्यापासून । सोडवील स्वामी माझा ॥ ५ ॥
राम माझाचि नाहीं नेमिला । जे जे शरण गेले त्यांचाच झाला ॥
परी रामासारिखा स्वामी फावला[2] । तेचि धन्य संसारीं ॥ ६ ॥
राम सकळ प्राणिमात्रांचा । आणि कैवारी देवां ऋषीश्वरांचा ॥
सार्थी[3] अडाळेयांचा । समर्थी आपंगी ॥ ७ ॥
आतांही जयास वाटे भेटावें । रामें मज सांभाळित जावें ॥
ऐसें दृढ घेतलें जीवें[4] । तरी ऐका मी सांगेन ॥ ८ ॥
श्रीराम जयराम जयजयराम । ऐसा कांहीं करूनियां नेम ॥
जप कीजे तेणें आत्माराम । जोडेल नियमें ॥ ९ ॥

---

१ रक्षण करावें २ मिळाला ३ सहाय्य करणारा ४ मनानें ५ करावा.

परी कोणासी कळों नेदावा । जप अंतरींच करावा ॥
जैसा कृपणासी धनठेवा । सांपडला एकांतीं ॥ १० ॥
राम जपे त्याचें चित्त पाहतो । जप करितां क्षीण येतो ॥
विकल्पें अंतरीं प्रवेशतो । तरी ढळेना मेरु जैसा ॥ ११ ॥
कां प्रपंचीं होती थोर आघात । तेणें चित्त होय दुश्चित ॥
देहासी आपदा होती अत्यंत । तरी रामासी विसरूं नये॥ १२॥
जप नेमिला तो चुकों नेदावा । त्या वेगळा सर्वदा स्मरावा ॥
मळत्यागींही न विसंबावा । कर्मठपणें करूनि ॥ १३ ॥
ऐसें अखंड नाम स्मरावें । परी दुसरियासी कळों नेदावें ॥
निदिध्यास लागलिया राघवें । पाविजे तात्काळ ॥ १४ ॥
वैरें निदिध्यास रावणें केला । त्याचा संकल्प त्यासी फळला ॥
मां जेणें दास्यत्वें उपासिला । तो राम कैसा नव्हे ॥१५॥
कांहीं साक्षात्कार झाला । तो सांगों नये दुसरियाला ॥
जरी आंळकेपणें सांगितला । तरी पुन्हा होणार नाहीं ॥१६॥
पुन्हा साक्षात्कार कैंचा । झाला तरी वरपंगाचा ॥
हा मी आपुले जीवाचा । अनुभव सांगतों ॥ १७ ॥

---

१ मनांतच २ संशय ३ मेरू नांवाचा अढळ पर्वत ४ संकटें ५ विपत्ति ६ छंद ७ आशाळभूतपणानें ८ वरवरचा.

## रामउपासना

८१०) कांस या रघुनाथाची । धरितां सुख पावलों ॥
इतर कष्टती प्राणी । थोर संसारसांकडीं ॥ १ ॥
सांकडीं तोडिलीं माझीं । राघवें करुणालयें ॥
पूर्वींच तुटली माया । दुःख शोक विसंचला ॥ २ ॥
सेवकू मानवीयांचे । कष्टती बहुतांपरी ॥
सेविला देव देवांचा । तेणें मी धन्य जाहलों ॥ ३ ॥
नीच हे मानवी प्राणी । नीचाश्रय कामा नये ॥
महत्कीर्ति श्रीरामाची । फावला महदाश्रयो ॥ ४ ॥
विबुधां आश्रय ज्याचा । पावले बंधमोचनें ॥
सेवकू मारुती ऐसा । त्याचा मी म्हणती जनीं ॥ ५ ॥
निवाला शिव ज्या नामें । ज्या नामें वाल्मीकि ऋषि ॥
जें नाम सकळां तारी । तें नाम मज अंतरीं ॥ ६ ॥
कुळ या जगदीशाचें । धन्य वंश भूमंडळीं ॥
आपलीं वाहती सर्वें । धन्य तूं बा रघूत्तमा ॥ ७ ॥
देव हा सर्व अंतरात्मा । वात हा त्याजपासुनी ॥

---

१ आश्रय २ दुःखें ३ नाहींसा झाला ४ सेवक–चाकर ५ मिळाला ६ देवांना ७ कारागृहवासांतून सुटका.

वातसुत[1] हनुमंतु । रामसेवक हा जनीं ॥ ८ ॥
शिव तो राघवा ध्यातो[2] । राम ध्यातो सदाशिवा ॥
सख्यत्वें चालती दोघे । प्रसिद्ध ठाउके जनीं ॥ ९ ॥
शक्तीतें शक्ति शिवाची । शिवशक्ती समागमें ॥
अंश जे चंद्रमौळीचे[3] । ते सर्व प्रभुचे[4] सखे ॥ १० ॥
एकचि अंश विष्णूचे । देवमात्र भूमंडळीं ॥
एकांशें चालती सर्वें । यालागीं सर्व एकची ॥ ११ ॥
स्वर्गीचे देव इंद्रादि । मृत्युलोकीं समस्तही ॥
पाताळीं पन्नगोदिक[5] । सर्वत्र पाहतां सखे ॥ १२ ॥
रामउपासना ऐसी । ब्रह्मांड व्यापिती पहा ॥
राम कर्ता राम भोक्ता । रामरूप वसुंधरा ॥ १३ ॥

## रामकृपेनें ज्ञान

(११) ज्ञानेंचि चुकती जन्म । ज्ञानेंचि सुटका घडे ॥
ज्ञानेंचि पाविजे मुख्या । निर्गुणा परमेश्वरा ॥ १ ॥
ज्ञानेंचि ज्ञान शोधावें । ज्ञानें अज्ञान त्यागणें ॥
ज्ञानेंचि पाविजे मुख्य । निर्गुणा परमेश्वरा ॥ २ ॥
ज्ञानेंचि चालती कर्मे । ज्ञानमार्ग उपासना ॥

---

१ वायुसुत–हनुमंत २ पूजा करितो ३ शंकराचे ४ रामप्रभूचे ५ पन्नग–नाग.

ज्ञानेंचि पाविजे मुख्या। निर्गुणा परमेश्वरा ॥ ३ ॥
ज्ञानेंचि प्रत्ययो येतो। ज्ञानें संदेह तूटती ॥
ज्ञानेंचि पाविजे मुख्या। निर्गुणा परमेश्वरा ॥ ४ ॥
हें ज्ञान **रामकृपेनें**। धन्य रामउपासना ॥
रामदास्य घडे ज्याला। तो सर्वत्र रामदास हो ॥ ५ ॥

---

यत्नाचा लोक भाग्याचा। यत्नेंवीण दरिद्रता ॥
उमजला लोक तो धाला। उमजेना तो हपापिला ॥७॥
हिंडतां शहाणें होतें। बोलतां बोल शीकतें ॥
वाचितां लिहितां येतें। तेणें हें मान्य होतसे ॥ २ ॥
घरींच बैसतां खोटें। ब्राह्मणु हिंडतां बरा ॥
आळशी घातवेणा[1] तो। कष्टिला म्हणजे बरा ॥ ३ ॥
प्रसंगें वर्ततां आलें। यथातथ्यचि सूचिलें ॥
मनुष्य राखिलें राजी। तो प्राणी शहाणा बरा ॥ ४ ॥
समयीं धीर सोडीना। यत्नीं यत्न बरा करी ॥
हिंडतां पारखी[2] लोका। कार्यकर्ता जिवीं[3] धरी ॥ ५ ॥
मैत्रिकी हे विटों नेदी। सर्वांसी सारखा दिसे ॥
विचार जाणता मोठा। दक्ष तो जाणता जनीं ॥ ६ ॥

---

१ आत्मघातकी २ परीक्षा करी ३ मनांत.

उदंड ओळखी होतां । उदंड भाग्य होतसे ॥
उदंड कलहो होतां । उदंड लाथ खातसे ॥ ७ ॥
विचारें गोड बोलावें । बहुतां मान्यसें बरें ॥
भांडतां पुरवेना कीं । मैत्रिकी करितां बरें ॥ ८ ॥
करावें तेंचि पावावें । हें आलें आपणांकडे ॥
आपलें आपणांपासीं । जनासी काय बोल हा ॥ ९ ॥
वेषानें कार्य साधेना । विवेकें कार्य साधतें ॥
विवेकी मानिती ज्याला । धन्य तो ब्राह्मणू जनीं ॥ १० ॥
पराचें कार्य-कर्ता जो । त्याचें कार्य कसें नव्हे ॥
तांतडी तांतडी धांवे । बरेंपणें मनोगतें ॥ ११ ॥
स्नानसंध्या टिळेमाळ । उदास तापसी फिरे ॥
उत्तमु तो नये वाट्या । जेथें तेथें विराजतो[1] ॥ १२ ॥
एके स्थळीं स्थिरावेना । नित्य नूतन साजिरा ॥
किर्ति ते [2]दिगंतीं धांवे । ने[3]मस्त राहतां जनीं ॥ १३ ॥

भाग्यासी काय ऊणें रे । यत्नावांचूनि राहिलें ॥
यत्न तो करावा कैसा । हेंचि आधीं कळेचिना ॥ १ ॥
मुख्य यत्न विचाराचा । त्यावरी बोलणें बरें ॥
चालणें सत्य नेमाचें । नीतिन्याय चुको नये ॥ २ ॥

---

१ शोभतो २ दूर ३ नित्यनेम पाळून.

सांगोंचि जाणते सर्वै । कर्ता कोणी दिसेचिना ॥
जाणते नेणते सांगों । स्वभाव लागला जनीं ॥ ३ ॥
करंटे मिळाले सर्वै । जो तो बुद्धीच सांगतो ॥
सांगावें तें आपणाला । आपणु करितां बरें ॥ ४ ॥
लोकांच्या गोष्टीनें वर्ते । प्रत्यय पाहिल्याविणें ॥
आळसें चाळणा नाहीं । स्वता बुद्धी कळेचिना ॥ ५ ॥
हीत ते आपुली बुद्धी । शोधुनी पाहणें बरें ॥
पाहिल्यावीण जो कर्ता । त्याचें कार्य बरें नव्हे ॥ ६ ॥
सांगती लोक ते कैसें । आपणु ऐकतो कसा ॥
स्वयें जो परीक्षा नेणे । लोकांचे ऐकिलें करी ॥ ७ ॥
श्वा[1]नामी त्वरिता लागे । ऐसा तो जाणिजे नरु ॥
खरें खोटें विचारीना । लोकांचें शिकविलें करी ॥ ८ ॥
मोठें तें पाप लोकांचें । प्रभु तो जाणता नव्हे ॥
वर्ततो शिकविल्या बोलें । तो काय हैसें[2] मंगळू ॥ ९ ॥
प्रपंच नासतो ऐसा । भाग्य जातें निघोनिया ॥
यालागीं सर्व सांभाळी । तोचि साहेब नेटका ॥ १० ॥
खबर्दार बरा राजा । विवेकी सर्व साक्षपी ॥
आज्ञेनें सर्वही चाले । तेणें सौख्य बहू जना ॥ ११ ॥

---

१ कुत्र्यासी २ मठ्ठ.

पोराला माय जाणेना । ते पोरें वाचती कशीं ॥
गुराखी राखतो गुरें । धणी दोहींस पाळितो ॥ १२ ॥

अत्र[1] बोलिलें ऐसें । येणें न्याय परत्रेही[2] ॥
प्रत्ययो शोध शोधावा । सावधान चहूंकडे ॥ १३ ॥

सर्वत्र राखणें राजी । सुखदुःख जाणोनिया ॥
सर्वांची वाहावी चिंता । बुद्धिवंत करावया ॥ १४ ॥

लोक ते शहाणे केले । जन्मापासूनि सोडिले ॥
प्रचीती समस्तां लोकां । भक्तिमार्ग प्रतिष्ठिला[3] ॥ १५ ॥

---

स्वदेश राहिला मागें । विदेश लागला पुढें ॥
आचार राखणें आधीं । स्नानसंध्या पवित्रता ॥ १ ॥

अचुक शुद्ध ल्याहावें । वाचावें नीटनेटकें[5] ॥
साकल्य[4] अर्थ सांगावा । यथातेथ्य प्रचीतीनें ॥ २ ॥

बोलावें न्यायनीतीनें । मर्यादा राखणें जनीं ॥
अभ्यास करावा आधीं । ताळबंध पाठांतरें ॥ ३ ॥

---

१ या लोकीं २ परलोकीं ३ स्थापन केला ४ संपूर्ण ५ बरोबर.

प्रसंगमान[1] जाणावें । जाणावें बहुतांपरी ॥
भक्तिभाव असों द्यावा । घालावा भार ईश्वरीं ॥ ४ ॥
प्रत्यहीं[2] मागणें भिक्षा । मिळाली न मिळे तरी ॥
नित्य नूतन हिंडावें । धुंडावे भक्त प्रेमळ ॥ ५ ॥
कथा ते करावी आधीं । बाधी ते दुराशा नको ॥
उपाधी आतळोवेना[3] । जावें ना वैभवाकडे ॥ ६ ॥
सर्वत्र लोक शोधावे । बोधावे भक्तिच्या गुणें ॥
राहावें दुर्बळांचेथें[4] । देवाल्यें[5] वा नदीतीरीं ॥ ७ ॥
पर्वतीं उदकापासीं । सन्निधचि एकीकडे ॥
फार एकांत सेवावा । अभ्यास नित्य नूतनू ॥ ८ ॥
साहावी[6] शीतउष्णादि । पाहावीं रम्यसीं स्थळें ॥
करावें आपण कष्ट । बांधावीं ते हळु हळु ॥ ९ ॥
ओळखी कराव्या दाढा[7] । एके ठायीं स्थिरों नये ॥
वाद-विवाद तो खोटा । दाटावा मदमत्सर ॥ १० ॥
उद्धट बोलणें खोटें । बोलावीं मृदु उत्तरें ॥
नेटकी पाहिजे दीक्षा । रक्षावी भक्ति आदरें ॥ ११ ॥

---

१ प्रसंग–वेळ २ दररोज ३ संबंध पडूं देऊं नये ४ दुर्बळाचे येथें ५ देवालयांत ६ सहन करावी ७ पुष्कळ.

भक्ति-ज्ञान असों द्यावें । शुद्ध वैराग्य नेटकें ॥
धरावीं कीर्तीचीं द्वारें । तारावीं भाविकें बहु ॥१२॥
अत्यंत साक्षेपी[1] व्हावें । न व्हावें आळशी कदा ॥
ध्यावा या देहाचा लाहो[2] । जायाचें हें ह्मणोनियां ॥१३॥
मरोनि कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्ति ते ॥
धन्य धन्य म्हणे लोक । सत्क्रिया करितां बरी ॥१४॥
पुण्यमार्ग प्रतिष्ठावा । लावावी धर्म-वासना ॥
देवालयें करावीं मोठीं । वापी[3] कूपें सरोवरें ॥ १५ ॥
सावधू सकळा ठायीं । न्याय नीति चळों नये ॥
सकळांसीं सख्य राखावें । वर्तावें तें मनोगतें ॥ १६ ॥
वैभवें सर्व देवाचें । वाढे छलें परोपरी ॥
किती म्हणोनी सांगावीं । सांभाळावीं समस्त हीं ॥१७॥
दास्य तें करावें ऐसें । यामध्यें घडेल तसें ॥
देव सांग करी सर्वै । भावार्थ पाहिजे बरा ॥ १८ ॥

---

वन्ही[4] तो चेतवावा रे । चेतवितांच चेततो ॥
विवेक जाणिजे तैसा । वाढवितांच वाढतो ॥ १ ॥

---

१ उद्योगी २ छंद-वासना ३ विहीरी ४ विस्तव ५ पेटवावा.

संग तो साक्षपीयांचा[1] । धरितां साक्षपु घडे ॥
साक्षपें साक्षपु वाढे । पुरती मनकामना ॥ २ ॥

कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळची पाविजे ॥
आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्मांड भोगवी ॥ ३ ॥

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ॥
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥ ४ ॥

अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ॥
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ॥५॥

साक्षेधु देव जाणावा । उन्मत्त दैत्य बोलिजे ॥
होरट्या[2] दैत्य जाणावा । देव तो सौख्यदायकु ॥६॥

साक्षपी अंश देवाचे । आळशी वंश दानवी ॥
राक्षसी दैत्य तो मोठा । अन्यायें दैत्य जाहला ॥७॥

देव सर्वांस सांभाळी । तदंश[3] जाणिजे तसा ॥
दैत्य ते पीडिती लोकां । तदंश त्याच सारिखे ॥ ८ ॥

दंभ-दर्प-साभिमानें । कर्कशें वचनें मुखीं ॥
कोपी ते दैत्य जाणावे । निष्ठुर परघातकी ॥ ९ ॥

---

१ उद्योगी लोकांचा २ हट्टी ३ त्यांचे अंश.

हीत तें देव कर्ता तो । कृपाळू भक्त वत्सळ ॥
पाळकू देव जाणावा । चाळकू[1] जगदंतरें ॥ १० ॥
तो देव जाणिजे ज्ञानें । ज्ञानी त्यासीच बोलिजे ॥
विज्ञानी ब्रम्हयोगी तो । वृत्ति-शुन्य पुरातनू ॥ ११ ॥

## पंचवटीच्या श्रीरामोपासकांना समर्थांचें पत्र

जनस्थान[2] गोदातटी[3] । परम पावन पंचवटी ॥
जेथें पडिली कृपादृष्टी । रघूत्तमा रायाची ॥ १ ॥
तेथील रामउपासक । त्यांच्या सेवकांचा सेवक ॥
तुम्हांमध्यें मी एक रंक । सरतें करावें ॥ २ ॥
तुम्ही निकट[4] देवापाशीं । आणि मी पडिलों दुरि देशीं ॥
कृपाळुपणें रघुनाथासी । माझी करुणा भाकावी[5] ॥ ३ ॥
म्हणावे ते अनाथ । समर्था तूं दीनानाथ ॥
म्हणावे ते पतित । तूं पतित-पावनु ॥ ४ ॥
म्हणावे ते परम किंकर[6] । देवा तूं करुणाकर ॥
म्हणावे ते निराधार । आधार इच्छी ॥ ५ ॥

---

१ हालविणारा २ नाशिक ३ गोदावरीचा काठ ४ जवळ ५ मागावी ६ दरिद्री.

सत्य मिथ्या तुझा म्हणवीं । त्याची चिंता असो द्यावी ॥
ऐसी करुणा करावी । नाना प्रकारीं ॥ ६ ॥
तुम्हा दासांमध्यें मी हीनु । माझे कोट्यावधी अवगुण॥
परंतु आहे अनन्य[1] ॥ सेवक रघुनाथाचा ॥ ७ ॥
पुढें म्यां ऐसेंचि असावें । माझें मन न पालटावें ॥
इतकें देवासी मागावें । तुम्हीं बंधुवर्गीं ॥ ८ ॥
प्रत्यहीं[2] माझा नमस्कार । देवासीं करावा निरंतर ॥
मजकारणें शरीर । इतुकें कष्टवावें ॥ ९ ॥
बाळ वृद्ध नर नारी । सकळ भक्त कुमार कुमारी ॥
समस्तांसी नमस्कारीं । कृष्णातीरवासी ॥ १० ॥
शुद्ध उपासना विमल ज्ञान । वीतराग ब्राह्मण्य-रक्षण ॥
गुरुपरंपरेचें लक्षण । शुद्ध मार्ग ॥ ११ ॥
ऐसें पंचधा बोलिलें । इतुकें पाहिजे यत्नें केलें ॥
म्हणिजे सकळहि पावलें । म्हणे दासानुदास ॥ १२ ॥

## रामदास्य

कायावाचामनें । यथार्थ[3] रामीं मिळणें ॥
तरीच श्लाघ्यवाणें । रामदास्य ॥ १ ॥

---

१ एकनिष्ठ २ दररोज ३ बरोबर, तंतोतंत.

कामक्रोध [1]खंडणें । मदमत्सर [2]दंडणें ॥
तरीच श्लाघ्यवाणें । रामदास्य ॥ २ ॥
परस्त्रीं नपुंसक होणें । परद्रव्य न पोसणें ॥
तरीच श्लाघ्यवाणें । रामदास्य ॥ ३ ॥
जैसें मुखें बोलणें । तैसी क्रिया चालणें ॥
तरीच श्लाघ्यवाणें । रामदास्य ॥ ४ ॥
माया निवर्तक ज्ञानें । ज्ञेयचि पै[3] होणें ॥
तरीच श्लाघ्यवाणें । रामदास्य ॥ ५ ॥
रामदास म्हणे । निर्गुण सुख [4]लाधणें ॥
तरीच श्लाघ्यवाणें । रामदास्य ॥ ६ ॥

## रामदास

भव्य रूप अति सुंदर दीक्षा ।
रामनाम स्मरणें करि भिक्षा ॥
वृत्ति होईल उदासिन जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ १० ॥
नाठवे [5]धनसुतालय-जाया ।
मृगजळापरि [6]भावित काया ॥

१ नाहींसें करणें २ शिक्षा करणें ३ पादपूरणार्थ अव्यय ४ मिळणें
५ द्रव्य, मुलगा, घर व बायको. ६ मानतो.

परवधू जननीसम जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ २ ॥

शुद्ध भक्त हरिची करि पूजा ।
विश्व पाहे आपणास ओजा ॥
शांति पूर्ण बरवी धरि जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ३ ॥

करि कथा परि न वांछितें[1] कांहीं ।
चित्तवृत्ति अवघी हरिपायीं ॥
कल्पना समुळ[2] तोडिल जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ४ ॥

नित्यनेम बरवा जगिं ज्याचा ।
प्रतिदिनीं हरिचे भजनाचा ॥
गुरुपदीं रचना असे जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ५ ॥
सर्व लोक भजनाप्रति लावी ।
लाळुची[3] धनिं कदापि[4] नसावी ॥

---

१ इच्छित २ संपूर्ण–मुळासह ३ लोभ ४ केव्हांही.

बोलणें-सम क्रिया[1] करि जेव्हां ।
रामदास ह्मणणें मग तेव्हां ॥ ६ ॥
विमल ज्ञान वदे जगिं स्पष्ट ।
ब्रह्म निर्गुण कळे जगिं श्रेष्ठ ॥
सर्व मा[2]यिक अ[3]शी म[3]ति जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ७ ॥
बोलणें प्रचितीचें जगिं मान्य ।
निवडुं जो सकळाप्रति जाणे ॥
वांछिती जन सज्जन जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ८ ॥
निश्चयें करि राम–उपासना ।
रामनौमि रघूत्तम–पूजना ॥
तृप्त होति द्विज याचक जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ९ ॥
यत्न साधुन करि पुढें पाठ ।
अर्थ जाणुनि वदे जगिं स्पष्ट ॥
मागिले उजळणी करि जेव्हां ।
रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ १० ॥

---

१ घडे—पाठविशेष २ खोटें ३ असें बळे—पाठविशेष.

## समर्थ पंचवटींत जाऊन पुरश्चरण करूं लागले तेव्हां त्यांचेविषयींचें लोकमत

विषयांची सोयरीं प्रपंचाची सखी ।
मिळोनि एकमेकीं करिती मातें[1] ॥ १ ॥
यासि काय झालें घडचि कां विघडलें ॥
वयेंविण लागलें देवपीसें[2] ॥ २ ॥
देव काय आम्हां सकळांपासीं नसे ॥
जनावेगळें कैसें भजन याचें ॥ ३ ॥
हें आधींचि विषय-संसारा उबगलें[3] ।
पुरुषार्थें सांडवलें अहंतेच्या ॥ ४ ॥
यासि कोणी मोहाचे[4] वडिल-धेरे[5] नाहीं ॥
म्हणुनियां पाहीं छंद करी ॥ ५ ॥
न करवे म्हणुनी त्यजिला विषय-धंदा ।
जल्पतसे[6] सदा रामनाम ॥ ६ ॥
रामीं रामदासें पिसाळली माय ॥
म्हणोनि मोकली धाय विषयजनु ॥ ७ ॥

---

१ गोष्ट २ देवाचें वेड ३ कंटाळतें ४ मायेचे ५ सोयरे धायरे ६ बडबडतसे.

3620

## श्रेष्ठांच्या मरणानंतर समर्थांनीं त्यांच्या मुलांना पाठविलेलें पत्र

बरें सत्य बोला यथातथ्य चाला।
बहू मानिती लोक तेणें तुम्हांला ॥
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो।
बरा मूण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥
बरें दांत घांसोनियां तोंड धोवें।
कळाहीन कां शूद्रमुखीं नसावें ॥
सदा सर्वदा प्रेत्न सोडूं नको रे।
बहूसाल हा खेळ कामा नये रे ॥ २ ॥
दिसामाजिं कांहीं तरी ते लिहावें।
प्रसंगें अखंडीत वाचीत जावें ॥
वयें श्रेष्ठ रे दास्य त्यांचें करावें।
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥
बहू खेळ खोटा सदालस्य खोटा।
समस्तांसि भांडेल जो तोचि खोटा ॥

---

१ खरेपणानें २ अंतःकरणांत ३ धुवावें ४ तेजहीन ५ प्रयत्न ६ पुष्कळ ७ (सर्व) दिवसांत ८ एकसारखे–खंड न पडतां ९ सेवा.

बहूतां जनालागिं जीवें झिजावें ।
भले सांगती न्याय तेथें थिजावें ॥ ४ ॥

हिशेबीं सदा न्याय सांडूं नका रे ।
कदाचीत अन्याय होतां धका[1] रे ॥
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें ।
महा दुःख तेंही अकस्मात जातें ॥ ५ ॥

प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वाया ।
विवेकाविणें सर्वही दंभ जाया ॥
बहु सज्जेला[2] नेटका साज[3] केला ।
विचारेविणें सर्व ही व्यर्थ गेला ॥ ६ ॥

वरी[4] चांगलें अंतरीं गोड नाहीं ।
तया मानवाचें जिणें[5] व्यर्थ पाहीं ॥
वरी चांगलें अंतरी गोड आहे ।
तयालागीं कोणीतरी[6] शोधिताहे ॥ ७ ॥

सदा अंतरीं गोड तें सांठवेना ।
कदा अंतरीं वोखटें[7] तें खपेना ॥

---

१ भीति २ नटला ३ पोषाक ४ बाहेर ५ जगणें ६ सर्वलोक ७ कडू.

म्हणोनी बरा गुण आधीं धरावा ॥
महाघोर संसार हा नीरसावा[1] ॥ ८ ॥
भला रे भला बोलती तें करावें ।
बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें ॥
पुढें शेवटीं सर्व सांडूनि जावें ।
मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥
बरा वोखटा सर्व संसार झाला ।
अकस्मात येईल रे यमघाला[2] ॥
म्हणोनी भले सांगती सत्य चाला ।
जनीं दास तो शीकवीतो तुम्हाला ॥ १० ॥

---

मनीं लोचनीं[3] श्रीहरी तोचि पाहे ।
जनीं जाणता[4] भक्त होऊनि राहे ॥
गुणीं प्रीति राखे, क्रमू[5] साधनाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १ ॥
सदा देवकाजीं[6] झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वेद नित्य वाचा ॥

---

१ नाहींसा करावा २ यमाचा घाला--मरण ३ डोळ्यांत ४ ज्ञानी ५ क्रम—नेम ६ देवकार्यांत.

स्वधर्में[1]चि चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ २ ॥
सदा बोलण्यासारिखें चालताहे ।
अनेकीं सदा एकदेवासि पाहे ॥
सगुणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ३ ॥
नसे अंतरीं कामकारी[2] विकारी ।
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ॥
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४ ॥
मदें मत्सरें सांडिला स्वार्थबुद्धी[3] ।
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ॥
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५ ॥
क्रमी[4] वेळ जो तत्त्वचिंतानुवादें ।
न लिंपे कदा दंभवादें विवादें ॥

---

१ आपल्या वर्णाश्रम धर्मानें २ काम्यवासना उत्पन्न करणारा
३ स्वार्थबुध्दीनें ४ घालवी.

करी सूख-संवाद जो [1]उगमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ६ ॥

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं ।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥
न बोले कदा मिथ्य वाचा [2]त्रिवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ७ ॥

सदा सेवि आरण्य तारुण्य-काळीं ।
[3]मिळेना कदा कल्पनेचेन मेळीं ॥
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ८ ॥

नसे मानसीं [4]नष्ट आशा दुराशा ।
वसे अंतरीं प्रेम-पाशा [5]पिपाशा ॥
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ९ ॥

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ।
स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ॥

---

१ ब्रह्माच २ निश्चयानें ३ जो कल्पनेच्या जाळ्यांत सांपडत नाहीं ४ दुष्ट ५ पिपासा, तृष्णा.

तया अंतरीं क्रोध संताप कैचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १० ॥
नसे गर्व अंगीं सदा वीतरागी[1] ।
क्षमा–शांति–भोगी[2] दयादक्ष योगी ॥
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।
येहीं[3] लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥ ११ ॥
नव्हे चेटकी[4] चाळकू[5] द्रव्यभोंदू[6] ।
नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू ॥
नव्हे उन्मत्तू व्यसनी संगसाधू ।
जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू ॥ १२ ॥
नव्हे वाउगी चाहुटी काम पोटीं ।
क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ॥
मुखें बोलिल्यासारिखें चालताहे ।
मना सद्गुरू तोचि शोधूनि पाहे ॥ १३ ॥
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी ।
कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ॥

---

१ विरक्त–उदासीन २ क्षमा–शांति भोगणारा ३ या लक्षणांनीं युक्त ४ चेटकें करणारा ५ फसविणारा ६ भोंदुपणानें द्रव्य उपटणारा.

प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे ।
तयाचेन योगें समाधान बाणे ॥ १४ ॥
बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा ।
विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ॥
दया सर्वभूतीं जया मानवाला ।
सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ॥ १५ ॥
जनीं भोजनीं नाम वाचे वदावें ।
अती आदरें गद्य-घोषें ह्मणावें ॥
हरी-चिंतनीं अन्न जेवीत जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥ १६ ॥
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।
पुढें वैखरी राम आधीं वदावा ॥
सदाचार हा थोर सांडूं नये तो ।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥ १७ ॥

## स्फुट श्लोक

नव्हे राजयोगी महद्भाग त्यागी ।
उदासीन जो वीतरागी विरागी ॥
जनस्थान--गोदातटीं वास केला ।
प्रभू देखिला दास संतुष्ट झाला ॥ १ ॥

दिनानाथ विख्यात हें नाम साजे ।
प्रजापाळकू रामराजा विराजे ॥
बहू सुकृताचा[1] बरा काळ आला ।
प्रभू देखिला दास संतुष्ट झाला ॥ २ ॥
निघोनि जावें कठिणा वनाला ।
अखंड गात्रें मग पावनाला ॥
ऋणी करावें जगजीवनाला ।
प्रीती धरावी पदसेवनाला ॥ ३ ॥
म्हणे दास लोकांसि मी काय सांगों ।
तराया जनीं मीच कासेस लागों ॥
बरीं साक्षपें औषधें मेळवावीं ।
जया लागला रोग तेणेंचि घ्यावीं ॥ ४ ॥
बहुत सार विचार करी मना ।
दृढ धरी रघुनाथ उपासना ॥
रघुविरा भजतांचे सुखावसी ।
परम सुंदर तें पद पावसी ॥ ५ ॥

---

१ पुण्याचा.

मना चाल ऊठीं वना दुर्गमातें[1] ।
न गुंते भवागार[2]दारादिकांतें ॥
विवेकें विचारें विवंचूनि पाहीं ।
जनीं पाहतां सर्वथा ऊरि नाहीं ॥ ६ ॥
हवाया[3] नळे बाण भांडीं[4] अनंतें ।
बळें सोडितां जाति आकाशपंथें ॥
बत्ती लागतां वेळ नाहीं उडाया ।
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ ७ ॥
न जावेंचि तेथें लागेल जावें ।
न खावेंचि जें तें लागेल खावें ॥
वदावेंचि ना तें लागे वदावें ।
स्वभावेंचि निर्माण केलेंचि देवें ॥ ८ ॥
प्रसंगें घडे तेंचि मानूनि घ्यावें ।
अहंतागुणें दुःख शोका न घ्यावें ॥
पुढें काय होईल तें तें पहावें ।
विवेकेंचि ज्ञानें सूखें रहावें ॥ ९ ॥
देह भोग होणार कांहीं सुटेना ।
जनाच्या मना सांगतांही तुटेना ॥

---

१ जाण्यास कठीण २ संसार, घर, बायको इत्यादिकांनें ३ चंद्रजोत दारु ४ तोफा.

म्हणे दास ऊदास कांहीं न व्हावें ।
बरें वोखटें[1] सर्व साहोनि न्यावें ॥ ९ ॥
नुठे[2] घोष ज्या मंदिरीं[3] रामनामें ।
जळो संपदा जाळि तें हेमधामें[4] ॥
जळो बोल ते फोल वाचाळ ज्ञानी ।
नसे मानसीं राम कैवल्य–दानी ॥ १० ॥
करें पूजन राघवाचें करावें ।
पदें राघवा–आश्रमासींच जावें ॥
बरे कर्णबीळीं कथे ऐकवावें ।
सदा सर्वदा साधुसंगीं बसावें ॥ ११ ॥
रघूनायकासारिखा स्वामि दाता ।
असोनी शिरीं वाहसी व्यर्थ चिंता ॥
नको वीसरों राघवा भूजकांता ।
नुपेक्षी नुपेक्षी कदा तूज भ्रांता ॥ १२ ॥
स्वधामासि[5] जातां महा रामराजा ।
हनूमंत तो ठेविला याच काजा ॥
सदा सर्वदा रामदासासि पावे ।
खळीं गांजितां ध्यान सांडून धांवे ॥ १३ ॥

---

१ वाईट २ न उठे ३ घरा ४ सोन्याचीं घरें ५ आपल्या घरीं.

तारुण्य-लावण्य-संपन्न नारी ।
कौशल्यता-वैभव-चित्तहारी ॥
एकांत--काळीं पडतां संबंधू ।
अभिलाष[1] न करी तो धन्य साधू ॥ १४ ॥

श्रीरामचंद्रा करुणासमुद्रा ॥
ध्यातों[2] तुझी राजसयोग्यमुद्रा ॥
नेत्रीं न येरे तुजवीण निद्रा ।
कैं भेटसी बा मजला समुद्रा ॥ १५ ॥

जया यत्न फवेल तेणें करावा ।
महोत्सव या राघवाचा भरावा ॥
महायत्न देखोनियां काळ धाके ।
प्रतापें बळें वाजवावे तडाखे ॥ १६ ॥

जन वमनपरी[3] तूं टाकि थुंकून चित्ता ।
वन विजन[4] धरी तूं ज्ञानवैराग्यवंता ॥
विसर सकळ दुःखें पावती शांति रामीं ।
पहुडासि सुखशेजें[5] सर्व कल्याणधामीं ॥ १७ ॥

---

१--इच्छा २ चिंतन करितों ३ ओकासारखें ४ निर्जन-लोकरहित ५ सुख-शय्येवर.

सहज पडत आहे तैसतैसें करावें ।
अनुकुळ पडताहे तेथतेथें फिरावें ॥
अवचट[1] घडतें तें सज्ज होऊन येतें ।
खटपट करणें तें शेवटीं व्यर्थ जातें ॥ १८ ॥
स्वजन जन त्यजावे देश लंघूनि जावे ।
कठिण मन करावें झाडखंडीं भरावें ॥
अनुदिन विवरावें दूरि देशीं भरावें ।
निरुपण विवरावें तर्क-पंथेंचि जावें ॥ १९ ॥
रामदास देवदास नीजदास दास तो ।
दासदास तो उदास आसपास भासतो ॥
गुप्त परि तो फकीर त्या जिकीर कासया ।
पीर पीर बेफिकीर तो जिकीर हो तया ॥ २० ॥
भेटो कोणी एक नर, धेड, महार, चांभार ।
त्यांचें राखावें अंतर याचें नांव भजन ॥
दुःख न द्यावें कोणाला, उंच नीच जरी झाला ।
अंतरात्मा ओळखिला, तोचि जाणा सज्जन ॥ २१ ॥

---

१ एकदम.

( टाकळी मठांत सापडलेले समर्थकृत दहा श्लोक होते त्यांतील शेवटचे चार गहाळ झाले आहेत. )

निपट[1] कपट नाहीं अंतरांमाजि[2] कांहीं ।
परि मज जन देखों कां शकेना कदाही ॥
निवळ[3] निवळ माझें चित्त हें देवराया ।
बहुतचि नर मातें इच्छिती कां अपाया ॥ १ ॥
बहुतचि पिळपेचें, प्राण जातो दयाळा ।
मजवरि करुणेचा ओघ लोटीं कृपाळा ॥
कचकच न करीतां तो तिढा प्राप्त होतो ।
बहुतचि शिण होतो अंतरीं शोक येतो ॥ २ ॥
कठिण वचन लोकां आपणा बोलवेना ।
कठिण वचन कोणी बोलती फार नाना ॥
क्षणभरि सुख नाहीं जन्मदारभ्य[4] कोठें ।
कठिणचि बहु वाटे लोटतें दुःख मोठें ॥ ३ ॥
हुजुर[5] दम निघेना, अंतरीं कोंड नाना ।
तिळभरि स्थळ कोठें पाहतांही दिसेना ॥
बहुत विषम काळें दाटणी थोर झाली ।
म्हणवुनि चरणासी[6] वृत्ति गुंतोनि ठेली ॥ ४ ॥

---

१ अगदीं २ अंतःकरणांत ३ शांत कर ४ जन्मापासून ५ श्रीराम-सरकार ६ चरणकमलीं

बहुतचि सुकुमारा स्वस्थ नाहीं शरीरा ।
निशिदिनिं जनचिंता लागलीसे उदारा ॥
सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे ।
भजन जन उकावे सर्व आनंद पावे ॥ ५ ॥
विदित सकळ आहे त्यांत कांहीं न राहे ।
मतिहिन राहवेना हेतु तो धांवताहे ॥
पिसुणसळाचि वाटे आप्त नाहींच कोणी ।
म्हणवुनि करुणा हे बोलतो मोक्षपाणी[1] ॥ ६ ॥

*प्रथम लिहिणें दुसरें वाचणें ।
तिसरें सांगणें अर्थांतरें[2] ॥ १ ॥
आशंका[3]निवृत्ति ऐशी चौथी स्थिती ।
पांचवी प्रचीती अनुभवें ॥ २ ॥
साहवें तें गाणें सातवें नाचणें ।
टाळी वाजवणें आठवें तें ॥ ३ ॥
नववा अर्थभेद दहावा प्रबंध ।
अकरावा प्रबोध प्रचीतीस ॥ ४ ॥

---

१ मोक्ष आहे हातांत ज्याचा असा श्रीराम. (पाणी=हात).
*(खुद्द श्रीसमर्थांनीं आपल्या संप्रदायाचीं सांगितलेलीं वीस लक्षणें)=
२ अर्थाचें रहस्य--मर्म ३ शंकांचें निवारण.

बारावें वैराग्य तेरावा विवेक ।
चौदावा तो लोक राजी राखे ॥ ५ ॥
पंध्रावें लक्षण तें राजकारण ।
सोळावें तें जाण अभ्यग्रता[1] ॥ ६ ॥
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा ।
काळ समजावा सर्वा ठायीं ॥ ७ ॥
अठ्ठावें लक्षण वृत्ति उदासीन ।
लोलंगता[2] जाण तेथें नाहीं ॥ ८ ॥
एकोणिसावें चिन्ह सर्वांसी समान ।
राखे समाधान ज्याचें त्याचें ॥ ९ ॥
विसावें लक्षण रामउपासना ।
वेध लावी जना भक्तिरंगें ॥ १० ॥

( दासबोधांतर्गत )

**१४ दशक समास २ भिक्षानिरूपण**

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा[3] । मागितली पाहिजे भिक्षा ॥
ॐभवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥ १ ॥
भिक्षा मागून जो जेविला । तो निराहारी बोलिला ॥
प्रतिग्रहावेगळा झाला । भिक्षा मागतां ॥ २ ॥

---

१ चित्ताची एकाग्रता २ लोभ, हावरेपणा ३ व्रत, कर्तव्य.

संतासंत[1] जे जन । तेथें कोरान्न[2] मागोन करी भोजन ॥
तेणें केलें अमृतप्राशन । प्रतिदिनीं ॥ ३ ॥
वार लाऊन बैसला । तरी तो पराधीन झाला ॥
तैसीच नित्या-वेळीला[3] । स्वतंत्रता कैची ॥ ४ ॥
आठां दिवसां धान्य मेळविलें । तरी तें कंटाळवाणें झालें ॥
प्राणी एकाएकी चेवले[4] । नित्य-नूतनतेपासुनी ॥५॥
नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें ॥
तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ६ ॥
अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश ॥
जिकडे तिकडे स्वदेश । भुवनत्रयीं ॥ ७ ॥
भिक्षा मागतां किरेंकों[5] नये । भिक्षा मागतां लाजों नये ॥
भिक्षा मागतां भागों नये । परिभ्रमण करावें ॥ ८ ॥
भिक्षा म्हणजे कामधेनु । सदाफळ, नव्हे सामान्यु ॥
भिक्षा करी जो अमान्यु । तो करंटा जोगी ॥ ९ ॥
भिक्षेनें ओळखी होती । भिक्षेनें भ्रम चुकती ॥
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ॥ १० ॥
भिक्षा म्हणजे निर्भय स्थिती । भिक्षेनें प्रगटे महंती ॥
स्वतंत्रता ईश्वर-प्राप्ती । भिक्षागुणें ॥ ११ ॥

---

१ चांगले वाईट. २ कोरडी भिक्षा. ३ दररोजच्या भोजनपंक्तीस. ४ भ्रष्टले. ५ त्रासूं नये.

पृथ्वीमध्यें देश नाना । फिरतां उपवासी मरेना ॥
कोणीएके ठिकाणीं जना । जड नव्हे ॥ १२ ॥
गोरेज्य[1] वाणिज्य[2] कृषी[3] । त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी ॥
विसंभों[4] नये झोळीसी । कदाकाळीं ॥ १३ ॥
भिक्षेऐसें नाहीं वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य ॥
वैराग्य नसतां अभाग्य । एकदेशी ॥ १४ ॥
कांहीं भिक्षा आहे म्हणावें । अल्पसंतोषी असावें ॥
बहुत आणितां घ्यावें । मुष्टी[5] एक ॥ १५ ॥

## समर्थांची इच्छा.

रघुनाथदासा कल्याण व्हावें । अतिसौख्य व्हावें आनंदवावें ॥
उद्वेग नासो वरशत्रु नासो । नाना विलासें मग तो विलासो ॥ १ ॥
कोडें नको रे कलह नको रे । कापट्यकर्मी सहसा नको रे ॥
निर्वाणचिंता निरसी अनंता । शरणागता दे बहु धातमाता ।५।
अजयो न हो रे जयवंत हो रे । आपदा नको रे बहु भाग्य हो रे ।
श्रीमंतकारी जनहीतकारी । परउपकारी हरिदास तारी ॥ १ ॥

## वरयाचना.

पावनभिक्षा दे रामा । अर्थारोहण दे रामा ॥ ध्रु० ॥
अभेदभक्ती दे रामा । दीनदयाळा दे रामा ॥ १ ॥

---

१ गवळ्याचा धंदा २ व्यापार ३ शेतकी ४ विसरूं नये.
५ मूठभर ६ खर्चावा ७ संकट ८ दूर कर

( १ )

तद्रूपता मज दे रामा । आत्म-निवेदन दे रामा ॥ २ ॥
सज्जन-संगति दे रामा । अलिप्तपण मज दे रामा ॥३॥
ब्रह्मानुभव दे रामा । अनन्यसेवा दे रामा ॥ ४ ॥
मजविण तुज मज दे रामा । दास ह्मणे मज दे रामा ॥

( २ )

कोमळ वाचा दे रामा । विमळ करणी दे रामा ॥ ध्रु० ॥
प्रसंगओळखी दे रामा । धूर्त कळा मज दे रामा ॥ १
अंतरपारख दे रामा । बहुजनमैत्री दे रामा ॥ २ ॥
हितकारक तें दे रामा । जनसुखकारी दे रामा ॥ ३ ॥
विद्यावैभव दे रामा । उदासीनता दे रामा ॥ ४ ॥
मार्गों नेणे दे रामा । मज न कळे तें दे रामा ॥ ५ ॥
तुझी आवडी दे रामा । दास म्हणे मज दे रामा ॥ ६ ॥

( ३ )

संगीत गाणें दे रामा । आलापगोडी दे रामा ॥ ध्रु० ॥
धातामाता दे रामा । अनेक धाटी दे रामा ॥ १ ॥
रसाळ मुद्रा दे रामा । जाड कथा मज दे रामा ॥ २ ॥
दस्तकटाळी दे रामा । नृत्यकळा मज दे रामा ॥ ३ ॥
प्रबंध सरळी दे रामा । शब्द मनोहर दे रामा ॥ ४ ॥

सावधपण मज दे रामा । बहु पाठांतर दे रामा ॥ ५ ॥
दास ह्मणे रे गुणधामा । उत्तम गुण मज दे रामा ॥ ६ ॥

## श्री समर्थांची आरती.

॥ आरती रामदासा । सद्गुरु सर्वेशा ॥
॥ कायावाचा मनोभावें । ओवाळूं परेशा ॥ १ ॥
॥ रामदास मूर्तिमंत । रामचंद्र अवतार ॥
॥ कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ॥ २ ॥
॥ वैराग्य भक्ति ज्ञान । शांति क्षमा विरक्ती ॥
॥ विवेक सालंकृत । क्षमा दया सर्व भूतीं ॥ ३ ॥
॥ सच्चिदानंद घन । रामदास केवळ ॥
॥ दिनकर कृपायोगें । रामचंद्र निर्मळ ॥ ४ ॥

ॐ तत्सत्

REFBK-0003720
REFBK-0003720

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | १ | ताचि | तोचि |
| ७ | १४ | भाव | भाँव |
| १५ | ३ | उत्तम | उत्तम गुण |
| १६ | १५ | किंवा | क्रिया |
| २१ | ५ | नेमकेचि | नेमकचि |
| २५ | १५ | ९प्रेम | ९वाईट स्थिति |
| ३१ | ९ | बहुतसाल | बहुसाल |
| ३२ | ५ | आशाबद्धक | आशाबद्धत |
| ३३ | ५ | वतले | वर्तेल |
| ३३ | ११ | समाधानान | समाधानें |
| ३४ | ७ | नाशतो | नासतो |
| ३५ | ८ | विचारविण | विचारेंविण |
| ३५ | १२ | सौख्य | सख्य |
| ३५ | १५ | कार्येविण | कार्येंविण |
| ३६ | १३ | साधनपणें | सावधपणें |
| ३७ | १ | दशक ५ समास १२ | दशक १५ समास २ |
| ३७ | ८ | बोलेन | बोलोन |
| ३८ | १४ | प्रत्यकानें | प्रत्ययानें |
| ३९ | १ | संसारांत | संसारास |
| ४३ | १५ | चुकाविना | चुकावेना |

३७२१

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | ११ | मिळोन्चि | मिळोंचि |
| ४७ | ९ | मूखेपण | मूर्खपणें |
| ४८ | १८ | आस्तमानीं | अस्तमानीं |
| ४९ | ४ | हाद | हार्दे |
| ५१ | १ | सफळ | सकळ जनासी |
| ५३ | १ | पुढें ुढें | पुढें पुढें |
| ५८ | ७ | राजकरणीं | राजकारणीं |
| ६२ | १४ | चाळेणा | चाळेणा |
| ६५ | १३ | नय | नये |
| ६८ | १२ | सफळ | सकळ |
| ६८ | १४ | जगमित्र | विचित्र |
| ७२ | ४ | तेथ | तेथें |
| ७६ | १८ | वाखाणितों | वाखाणिलें |
| ७७ | ३ | दर्फुटें | दर्कुटें |
| ७८ | ११ | विश्वीं | विश्वीं |
| ८१ | १० | ुळजे | तुळजे |
| ८२ | ३ | गुणदाष | गुणदोष |
| ८७ | १० | व्यापिती | व्यापिनी |
| ८९ | १५ | राहेते | राहिलें |
| ९६ | ३ | हीनु | हीन |
| १०० | १७ | कंटाळतें | कंटाळलें |
| १०२ | २ | थिजावें | चि जावें |
| १०३ | १६ | वेद | वदे |
| ११७ | ११ | कलह | कलहो |

# श्री. सदाशिव खंडो आळतेकर यां
# प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

| पुस्तकाचें नांव | किं. रुपये |
|---|---|
| सुलभ दासबोध ... ... | १–०–० |
| समर्थ–रत्न–संग्रह ... ... | १–४–० |
| **बालबोध समर्थ–वाङ्मयमाला—** | |
| पुष्प १ लें-समर्थांची करुणापर कविता ... | ०–६–० |
| पुष्प २ रें-समर्थसुभाषित ... ... | ०–८–० |
| पुष्प ३ रें-समर्थांचें आत्मचरित्र ... | ०–६–० |
| पुष्प ४ थें-मनाचे श्लोक ( अर्थान्वयासहित ) | छापत आहे |

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

१. मुंबई—परचुरे, पुराणिक आणि मंडळी.
२. पुणें —नवीन किताबखाना.
३. कऱ्हाड—गिजरे आणि कंपनी.